रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ८
www.ramprahar.com

# राम प्रहर

शुक्रवार २५ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

कोकण रेल्वे विलिनीकरणासाठी रेल्वेमंत्र्यांशी चर्चा/२

हरिहरेश्वरची सागरी सुरक्षा होणार बळकट!/५

थाईबॉक्सिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंचे सुयश/८

### सर्पमित्रांना मिळणार फ्रंटलाईन वर्करचा दर्जा अन् विमा




**मुंबई :** राज्यातील सर्पमित्रांसाठी एक मोठी आणि दिलासादायक बातमी आहे. सर्पमित्रांना आता १० लाखांचा अपघात विमा देण्यात येणार आहे. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या संदर्भात शिफारस केली आहे. त्यानुसार सर्पमित्रांना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा देण्यात येणार आहे. यासोबतच सरकारकडून सर्पमित्रांना अधिकृत ओळखपत्रही दिले जाणार आहे. कित्येकदा सर्पमित्र अत्यंत जोखमीचे काम करत असतात आणि अनेकदा साप पकडताना त्यांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत त्यांना आर्थिक संरक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. या निर्णयामुळे सर्पमित्रांच्या कामाला प्रोत्साहन मिळणार असून आणि त्यांना सुरक्षितपणे काम करण्यास मदतदेखील होणार आहे.

# पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यात भारत-ब्रिटन ऐतिहासिक मुक्त व्यापार करार; अनेक फायदे

**लंडन : वृत्तसंस्था**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ब्रिटन भेटीदरम्यान भारत आणि युनायटेड किंगडम (युके) यांच्यात गुरुवारी (दि. २४) ऐतिहासिक मुक्त व्यापार करार करण्यात आला. या करारामुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापारात दरवर्षी सुमारे ३४ अब्ज डॉलर्सची (सुमारे २.८५ लाख कोटी रुपये) वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

भारताचे पंतप्रधान मोदी हे सध्या ब्रिटनच्या दौऱ्यावर गेले आहेत. या दौऱ्यात पीएम मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली. यानंतर दोन्ही देशाच्या प्रमुखांच्या उपस्थितीत भारताचे वाणिज्यमंत्री पीयुष गोयल आणि ब्रिटनचे व्यवसाय व व्यापार सचिव जोनाथन रेनॉल्ड्स यांच्यात हा करार झाला. दोन्ही नेत्यांनी या व्यापार करारावर स्वाक्षऱ्या केल्या.



या ऐतिहासिक करारामुळे भारताचे जागतिक व्यापारातील स्थान अधिक बळकट होणार असून दोन्ही देशांच्या आर्थिक संबंधांना नवसंजीवनी मिळणार आहे. या ऐतिहासिक करारानंतर पंतप्रधान मोदी व कीर स्टार्मर यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या वेळी स्टार्मर म्हणाले की, या कराराचा भारत व ब्रिटन या दोन्ही देशांना फायदा होईल. या करारामुळे दोन्ही देशांचे उत्पन्न वाढेल, लोकांचे राहणीमान उंचावेल, नोकरदारांच्या खिशातील पैसे वाढतील, उभय देशांमध्ये अधिक नोकऱ्या निर्माण होतील. व्यवसायासाठीचे वातावरण अधिक उत्तम होईल. यामुळे वस्तूंवरील कर कमी होईल व व्यापार अजून सुलभ होईल.

## व्यापार दरवर्षी २.८५ लाख कोटी रुपयांनी वाढणार

**भारत आणि ब्रिटनमधील मुक्त व्यापार करार हा एक ऐतिहासिक करार आहे. हा करार केवळ एक आर्थिक करार नसून दोन्ही देशांच्या सामायिक समृद्धीचा एक रोडमॅप आहे. भारतातील शेतकरी, मच्छीमार, एमएसएमई क्षेत्र, तरुणवर्ग आणि विविध उद्योगांना या कराराचा थेट फायदा होईल.**
**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान, भारत**

## मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरण

# हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुंबई उपनगरीय रेल्वेतील २००६मधील साखळी बॉम्बस्फोट खटला प्रकरणाच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला गुरुवारी (दि. २४) सर्वोच्च न्यायालयाने मर्यादित स्वरुपात स्थगिती दिली. असे करताना निर्दोष ठरल्यामुळे तुरुंगातून सोडलेल्या आरोपींना पुन्हा तुरुंगात जाण्याची आवश्यकता नसल्याचेही न्यायालयाने नमूद केले. त्यामुळे मुंबई सोडलेले ११ आरोपी तुरुंगाबाहेरच राहणार आहेत.

२००६ साली मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व १२ आरोपींना निर्दोष ठरवण्याचा निकाल काही दिवसांपूर्वी उच्च न्यायालयाने दिला होता. त्यापैकी एक आरोपी मयत आहे. या निकालाला राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या याचिकेवर गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश व एन.के. सिंह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र सरकारच्या बाजूने युक्तिवाद केला. उच्च न्यायालयाने सुटका केलेल्या आरोपींना लगेच पुन्हा तुरुंगात टाकले जावे, अशी राज्य सरकारची मागणी नाही, पण या प्रकरणात उच्च न्यायालयाने मांडलेली निरीक्षणे महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत चालू असलेल्या इतर प्रकरणांवर परिणाम करू शकतात. त्यामुळे या निकालाला स्थगिती दिली जावी, असे मेहता यांनी नमूद केले. या युक्तिवादाची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेत उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालावर स्थगिती आणण्याचे निर्देश दिले.

मुंबईत ११ जुलै २००६ रोजी लोकलमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटात १८९ जणांचा मृत्यू आणि ८००हून अधिक लोक जखमी झाले होते. या खटल्यातील सर्व १२ आरोपींची सबळ पुराव्यांअभावी उच्च न्यायालयाने निर्दोष सुटका केली होती. १२पैकी एका आरोपीचे नागपूर तुरुंगात कोरोनामुळे निधन झाले आहे. पुरावे पुरेसे नसल्याचे व साक्षीदारांच्या साक्षी १०० दिवसांनंतर नोंद झाल्यामुळे त्या ग्राह्य धरता येणार नसल्याचे नमूद करत मुंबई उच्च न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली होती.



### सर्वोच्च न्यायालयाची भूमिका

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, उच्च न्यायालयाचा निकाल हा लागू राहणार नाही. सर्व आरोपींना सोडण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा तुरुंगात आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तथापि, कायद्याच्या प्रश्नावर आम्ही असे म्हणू की, वादग्रस्त निकाल हा इतर कोणत्याही प्रकरणात उदाहरण म्हणून मानला जात नाही. म्हणून या निकालाला मर्यादित स्वरूपात स्थगिती असेल.

# महाडमध्ये कंपनीत ड्रग्जची निर्मिती

## ८८.९२ कोटींचा साठा जप्त; चार जणांना अटक

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसीमधील एका कारखान्यात अमली पदार्थाची निर्मिती केली जात असल्याचे उघडकीस आले आहे. या कंपनीतून महाड औद्योगिक वसाहत पोलिसांनी ८८.९२ कोटी किमतीचा अमली पदार्थांचा साठा जप्त करून चार आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणी मोठी साखळी असण्याची शक्यता असून पोलीस मुख्य सूत्रधाराचा शोध घेत आहेत.



महाड एमआयडीसीतील रोहन केमिकल्स प्रा.लि. या कंपनीमध्ये दोन महिन्यांपासून बेकायदेशीररित्या केटामाईन या अमली पदार्थाची निर्मिती केली जात होती. याबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली महाड औद्योगिक वसाहत पोलीस, महाड शहर पोलीस, पोलादपूर पोलीस, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग (एलसीबी) अलिबाग व अंमली पदार्थ नियंत्रण विभाग (एनसीबी) यांनी संयुक्तपणे कारवाई करीत कंपनीत छापा टाकला.

या वेळी कंपनीत बेकायदेशीररित्या केटामाईन हा अमली पदार्थ तयार करताना आरोपींना पोलीस पथकाने रंगेहाथ पकडले तसेच तेथून ३४ किलो केटमाईन पावडर, १३ किलो लिक्विड केटमाईन असा एकूण ८८ कोटी ९२ लाख २५ हजार रुपये किमतीचे ड्रग्ज जप्त केले. या प्रकरणी मच्छिंद्र तुकाराम भोसले (रा. जिते, ता. महाड), सुशांत संतोष पाटील (रा. मोहोप्रे, ता. महाड), शुभम सदाशिव सुतार (रा. पाचगाव, कोल्हापूर आणि रोहन प्रभाकर गवस (रा. चिंचोली बंदर, मालाड प.) या चार आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा १९८५चे कलम ८(सी), २२(सी), २५, २७(अ), २९, ४२, बी एन एस २०२३चे कलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. या कामगिरीबद्दल कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी पथकाचे अभिनंदन केले.

## निवडक


### थायलंड-कंबोडियात पुन्हा रक्तरंजित संघर्ष, १२ जण ठार

**बँकॉक, पनॉम पेन :** थायलंड आणि कंबोडिया यांच्यात पुन्हा एकदा सीमेवरून तणाव वाढला आहे. दोन्ही देशांच्या सैन्यांमध्ये गुरुवारी (दि. २४) सहापेक्षा अधिक सीमा भागात भागात चकमकी उडाल्या. यात थायलंडमधील १२ जणांचा मृत्यू झाला. यात बहुतांश नागरिकांचा समावेश आहे, तर अनेक जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. थायलंडने हवाई हल्लेही केल्यानंतर कंबोडियानेदेखील प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला.

### अनिल अंबानींच्या घर, कार्यालयावर ईडीचे छापे

**मुंबई :** तीन हजार कोटी रुपयांच्या कर्ज घोटाळाप्रकरणी रिलायन्स ग्रुपचे अध्यक्ष अनिल अंबानी आणि येस बँकेशी संबंधित असलेल्या ठिकाणांवर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) गुरुवारी (दि. २४) छापे टाकले. ५० कंपन्या आणि सुमारे २५ व्यक्तींचा समावेश असलेल्या मुंबई व दिल्लीतील ३५हून अधिक ठिकाणांवर मनी लॉण्डरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) छापे टाकण्यात आले आहेत.

# जेएनयू विद्यापीठात मराठी भाषा अध्यासन केंद्राचे उद्घाटन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू (जेएनयू) विद्यापीठामध्ये महाराष्ट्र सरकारच्या वतीने उभारण्यात आलेल्या कुसुमाग्रज मराठी अध्यासन केंद्र आणि छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २४) करण्यात आलं आहे.

या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उद्योगमंत्री आणि मराठी भाषा खात्याचे मंत्री उदय सामंत उपस्थित होते तसेच संभाजीराजे छत्रपतीही हजर होते.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पानिपतच्या लढाईचे उदाहरण देत मराठ्यांच्या इतिहासावर भाष्य केले तसेच देशासाठी लढणारा मराठी माणूस संकुचित विचार करू शकत नाही, असे म्हणत काही लोकांना छत्रपती शिवरायांच्या नावाची ॲलर्जी आहे, असा टोला लगावला.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, कुलगुरू महोदया, मी आपले मनापासून आभार मानतो आणि आपण काळजी करू नका. आम्हाला इथली आताची शांती माहीत आहे, आधीची शांतीही माहीत आहे, पण 'शांतीजी' आल्यापासून जी शांती तयार झाली आहे, ती आम्ही निश्चितपणे पाहिली आहे. त्यामुळे काळजी करण्याचे कारण नाही. हा देश कालही शिवरायांच्या नावाने ओळखला गेला, आजही शिवरायांच्या नावाने ओळखला जातो आणि उद्याही शिवरायांच्या नावानेच ओळखला जाईल. कोणी कितीही त्याला विरोध केला तरीही या ठिकाणी छत्रपती शिवराय हे खऱ्या अर्थाने आमच्या स्वराज्याचे जनक होते आणि म्हणून ते आमचे दैवत राहतील.

# रशियात विमान कोसळून सर्व ४३ जणांचा मृत्यू



**मॉस्को : वृत्तसंस्था**

रशियामध्ये प्रवासी विमान कोसळून कॅबिन क्रू आणि पाच लहान मुलांसह ४३ जणांचा मृत्यू झाला आहे. सैबेरियातील अंगारा एअरलाईन्स या कंपनीचे हे विमान चीन सीमेलगत असलेल्या अमूर प्रांतातील टिंडा शहराकडे जात होते, मात्र ते रशियातील पूर्व अमूर प्रांतामध्ये अपघातग्रस्त झाले.

रशियाच्या आपतकालीन मंत्रालयाने म्हटले आहे की, रशियाच्या नागरी उड्डाण विभागाला हे विमान टिंडा शहरापासून १६ किमी अंतरावर असलेल्या डोंगराळ भागात जळत असलेल्या अवस्थेत आढळून आले. खाली पडल्यानंतर विमानाने पेट घेतला आणि या आगीत सर्व ४३ जणांचा मृत्यू झाला. वृत्तसंस्थेने अधिकाऱ्यांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार खराब हवामानामुळे दृश्यमानता कमी झाल्याने हा अपघात झाला, असे प्राथमिक पाहणीत दिसून आले आहे.

# एसटी बसच्या एकेरी गट आरक्षणावरील ३०% भाडेवाढ रद्द

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबईतील चाकरमान्यांच्या भावना लक्षात घेता यंदा गौरी गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमानी-प्रवाशांच्या एकेरी गट आरक्षणावरील ३०% भाडेवाढ मागे घेण्यात येत असल्याची घोषणा परिवहनमंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळ गेली ७७ वर्षापेक्षा जास्त काळ महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित आणि किफायतशीर प्रवासी सेवा देत आले आहे. सण-उत्सवासाठी राज्यभरातील इतर ठिकाणाहून बसेस एकत्रित करून प्रवाशांना उपलब्ध करून दिलेल्या असतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर बसेसची कमतरता निर्माण होते. हे लक्षात घेता हा तोटा आणखी वाढला जाऊ शकतो! सबब, तो काही प्रमाणात कमी करण्यासाठी एकेरी गट आरक्षण करणाऱ्या प्रवाशांच्या तिकिटावर ३० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय महामंडळाने नाईलाजाने घेतला होता, परंतु उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुचनेनुसार तसेच मुंबई व उपनगरातील मराठी चाकरमान्यांच्या भावना लक्षात घेता यंदा एकेरी गट आरक्षणावरील ३० भाडेवाढ रद्द करण्यात येत आहे.

# तळगड परिसर निसर्ग सौंदर्याने नटला

## निवारा शेड, सौर दिवे उपलब्ध करण्याची मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा येथील तळगड किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने एक ऐतिहासिक स्थळ असून येथे येणाऱ्या पर्यटकांमध्ये वाढ होत आहे. सध्या तळगडाचा परिसर निसर्ग सौंदर्याने नटल्याने पावसाळ्यात हे स्थळ पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीतील ऐतिहासिक तळगड हे मुंबई-गोवा महामार्गापासून अंदाजे १४ किमी अंतरावर तळा शहरात वसलेले आहे. एक चांगले पर्यटनस्थळ ते म्हणून उदयास येत आहे, पण या गडावर विद्युत सुविधा नसल्याने सोलर पॅनलचे खांब उभे करून दिवे लावावेत, अशी अपेक्षा पर्यटकांतून व्यक्त होत आहे. त्याचबरोबर गडावर एकतरी निवारा शेड पुरातत्व विभागाने लक्ष घालून उभारावी, अशी मागणी केली जात आहे.

तळगड हा इतिहासाची साक्ष देत उभा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांकडे पुरंदरच्या तहात जे १२ किल्ले होते; त्यापैकी तळगड हा एक किल्ला होता. या किल्ल्याची तटबंदी मजबूत आहे.

तळगडाच्या पायथ्यापर्यंत तळा शहरातून पुसाटीकडून रस्ता झाला आहे. तेथून पायऱ्यांनी पायी गडावर चालत जावे लागते. थोड्या अंतरावर हनुमानाची दगडात कोरलेली मूर्ती आहे. त्याला हनुमान दरवाजा अथवा महाद्वार म्हटले जाते. तेथे पाणीसाठा आहे. तेथून पुढे पुन्हा पायऱ्यांनी चालत जावे लागते. या ठिकाणी रेलिंग होणे आवश्यक आहे. गडावर काही वास्तूंचे अवशेष व निसर्ग पहावयास मिळतो.

# लढवय्या पंतने ठोकले अर्धशतक

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

भारताचा यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत याने इंग्लंडविरुद्ध मँचेस्टर कसोटी सामन्यातील दुसऱ्या दिवसाच्या खेळात पायाला फॅक्चर असताना मैदानात उतरून उपयुक्त अर्धशतकी खेळी केली.

पहिल्या दिवसाच्या खेळात लंगडत मैदान सोडलेला पंत दुखापतीनंतरही २४ तासांच्या आत पुन्हा मैदानात उतरला. त्याने अर्धशतक ठोकून भारतीय संघाला ३५० पार नेले. अर्धशतकासह पंतने खास विक्रमाला गवसणी घातली आहे. भारताकडून एका कसोटी मालिकेत सर्वाधिक वेळा ५०पेक्षा अधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तो आता अव्वलस्थानी पोहचला आहे. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत त्याच्या भात्यातून पाचव्यांदा फिफ्टी प्लस धावसंख्या पहायला मिळाली.

# गणपती सजावटीसाठी शोधावा लागणार पर्याय

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सव जवळ येत असल्याने अनेकांनी गणरायाच्या आगमनासाठी आरास नेमकी कशी असेल यासाठी कल्पना सुचवण्यास सुरुवात केली आहे. काही मंडळींनी कृत्रिम फुलांच्या सजावटीसाठीचा पर्यायसुद्धा निवडला आहे, मात्र हा पर्याय आता फार काळ विचारात ठेवता येणार नाही. गणपतीच्या सजावटीसाठी आता नवा पर्याय शोधावाच लागेल, कारण राज्यात कृत्रिम, प्लास्टिक फुलांवर बंदीची घोषणा फलोत्पादनमंत्री भरत गोगावले यांनी केली आहे.



प्लास्टिक फुलांच्या अतिरिक्त वापरामुळे सर्व प्रकारच्या खऱ्या फुलांची बाजारपेठ अडचणीत आली असून फूल उत्पादक शेतकऱ्यांना याचा मोठा आर्थिक फटका बसत आहे. अलिकडच्या काळात बहुतांश कार्यक्रम, समारंभ, मंगल कार्यालय, मंदिर, उत्सवात प्लास्टिकच्या कृत्रिम बनावटीच्या फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. अशा फुलांच्या वापरामुळे शेती करणारे जवळपास २० ते २५ टक्के शेतकरी अडचणीत आले असून त्यांचा सुमारे अडीच ते तीन हजार कोटींचा व्यवसाय संकटात आला आहे, ज्यामुळे शेतकऱ्याच्या पोटावर पाय आणणारी ही कृत्रिम फुलांची विक्री बंद करण्याची मागणी जोर धरताना दिसली.

गणेशोत्सव अगदी महिन्यावर आल्याने गणेश मंडळ कार्यकर्त्यांनी आरास, देखाव्याच्या सजावटीसाठी नियोजन करण्यास सुरुवात केली आहे. खऱ्या फुलांच्या किमती अधिक असल्याने तसेच ती लवकर कोमेजत असल्यामुळे दररोज बदलणे जिकिरीचे काम असते. त्यामुळे प्लास्टिक फुलांचा सर्रास वापर होतो, मात्र त्यावरील बंदीमुळे सजावट करणाऱ्या गणेशभक्तांची पंचाईत झाली आहे.

### प्लास्टिक फुलांवरील बंदीमुळे पेच

कोकणात गणेशोत्सवाची मोठी धूम असते. सार्वजनिक उत्सवाबरोबरच घरगुती गणेशोत्सवात सजावटीवर भर असतो. अनेक ठिकाणी घरगुती गणेश सजावट स्पर्धादेखील आयोजित केल्या जातात. त्यामुळे आपल्या बाप्पाची आरास अधिक आकर्षक आणि मनमोहक कशी दिसेल याकडे गणेशभक्तांचा कल असतो. त्यासाठी प्लास्टिकची पाने फुले यांचा वापर सर्रास केला जातो. मुंबईतून येणार चाकरमानी हे सजावटीचे साहित्य सोबत घेऊन येत असतात, परंतु आता प्लास्टिक फुलांवरील बंदीमुळे सजावटीसाठी कुठला नवीन पर्याय निवडायचा असा पेच गणेशभक्तांसमोर उभा आहे.

# कोकण रेल्वेचे भारतीय रेल्वेत विलिनीकरण करा

## खासदार धैर्यशील पाटील यांची रेल्वेमंत्र्यांशी चर्चा

**पेण : प्रतिनिधी**

कोकणाच्या विकासाला हातभार लावणाऱ्या कोकण रेल्वे महामंडळाला आता २५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. या महामंडळाचे आता भारतीय रेल्वेत विलिनीकरण करणे गरजेचे आहे. तसे झाल्यास त्याचा फायदा कर्मचाऱ्यांसह रेल्वे प्रवाशांना होणार असल्याने केंद्राने याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.



खासदार धैर्यशील पाटील यांनी नुकतीच रेल्वेमंत्र्यांची भेट घेऊन रायगडसह कोकणातील रेल्वे संदर्भात वैष्णव यांच्याशी चर्चा करत आपली भूमिका मांडली. पंचवीस वर्षात कोकण रेल्वेने मोठी प्रगती साधलेली आहे. कोकणाच्या विकासातही कोकण रेल्वेचे मोठे योगदान असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

आता मात्र कोकण रेल्वेचे भारतीय रेल्वेमध्ये विलिनीकरण करण्याची आवश्यकता आहे.कारण या रेल्वेच्या देखभाल, दुरुस्ती होत राहणार आहे. यासाठी जर हे महामंडळ बरखास्त करुन संपूर्ण कोकण रेल्वेच मुख्य भारतीय रेल्वेच्या प्रवाहात विलीन झाली तर त्याचा फायदा कोकण रेल्वेला होणार असल्याचेही धैर्यशिल पाटील यांनी रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणले.

कोकण रेल्वे मार्गावर आतापर्यंत दुहेरीकरण, विद्युतीकरण,सिग्नल यंत्रणा आदी सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत,जर कोकण रेल्वेचे मुख्य भारतीय रेल्वेत विलिनीकरण केले गेले तर त्याचा सर्वाधिक फायदा हा येथील प्रवाशांना होणार असल्याचा दावाही त्यांनी केला. भारतीय रेल्वेतर्फे प्रवासी सेवेसाठी जे जे उपक्रम राबविले जातात त्याचा फायदा प्रवाशांना निश्चित होणार असल्याचा दावाही केला.

दिवा-सावंतवाडी एक्सप्रेस ही कोकण रेल्वेवरील महत्वाची सेवा असून तिचा थांबा पेण येथे दिल्यास संपूर्ण परिसराच्या दळणवळणात लक्षणीय सुधारणा होईल आणि सामाजिक-आर्थिक प्रगतीलाही बळ मिळेल. रेल्वे मंत्री महोदयांनी सदर प्रस्ताव अत्यंत सकारात्मकपणे ऐकून घेतला असून, मला विश्वास आहे की लवकरच याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल. नागरिकांच्या गरजा आणि त्यांच्या सोयीसाठी लढणं हेच माझं कर्तव्य आहे, अशी प्रतिक्रिया खासदार धैर्यशील पाटील यांनी दिली.

यावेळी कोकण रेल्वेचे मुख्य भारतीय रेल्वेत विलिनीकरण करण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. येणाऱ्या काळात ही प्रक्रिया अधिक गतिमान करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

याशिवाय रेल्वे प्रवाशांसाठी चांगल्या सुविधा देण्यासाठी रेल्वे प्रशासन कटिबद्ध असल्याची ग्वाहीही वैष्णव यांनी दिली.

## वाशिवलीत एनएमएमटी बसचालकाला मारहाण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेने प्रवाशांच्या सोयीसाठी कोरोना काळामध्ये वाशिवली (रसायनी) ते सीबीडी बेलापूर बससेवा सुरू केली आहे. वाशिवली येथून बेलापूरकडे जात असताना वाशिवली येथे रामा कंपनी जवळ एनएमएमटीचे वाहन चालक यांना मारहाण झाल्याची घटना घडली

रसायनी पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार मलप्पा यशवंत पुजारी (वय ३९, रा. दिघा, नवी मुंबई) हे वाशिवली गाव अशी बस प्रवाशांना घेवून रामा कंपनीकडे वळवण्यासाठी गेली असताना भास्कर पाटील (रा.वाशिवली) व संतोष थोरवे (रा.वानिवली) यांनी वाहन चालकास दमदाटी करत ही जागा माझ्या मालकीची आहे येथे बस वळवायची नाही असे बोलून शिवीगाळ केली व भास्कर पाटील यांनी हातात असलेल्या काठीने मलप्पा पुजारी यांच्या उजव्या हाताला मारून दुखापत केली तर संतोष थोरवे यांनी बसच्या दरवाजाच्या आतमध्ये जावून शिवीगाळ करून हाथाबुक्क्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली.

याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात सरकारी कर्मचारी यांना शिवीगाळ व मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा पवार अधिक तपास करीत आहेत.

## मुख्यमंत्री कृती आराखडा कार्यक्रमाची महावितरणकडून प्रभावी अंमलबजावणी

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शासकीय योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी तसेच विविध विभागातील कामांना चालना देण्यासाठी व विभागातील कामे तळागळापर्यंत व अधिक लोकाभिमुख करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १५० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमाची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर, महावितरणच्या भांडूप परिमंडलाने नवीन वीज जोडणी, नावात बदल, पत्यात दुरुस्ती, वीजबिल बाबत तक्रार निवारण, वीजपुरवठा खंडित तक्रार निवारण अश्या प्रकारची विविध कामे यशस्वीरीत्या राबविण्यात आली.

कोंकण प्रादेशिक परिक्षेत्राचे सह व्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी भांडूप परिमंडलात या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले होते. त्या प्रमाणे, भांडूप परिमंडलाचे, मुख्य अभियंता संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २ मे २०२५ला सुरु झालेल्या या १५० दिवसाचा कृती आराखडा कार्यक्रमात महावितरणच्या भांडूप परिमंडलाने ११,८६२ नवीन वीज जोडणी दिली आहे. २२,७३५ ग्राहकांच्या नावात बदल करण्यात आले आहेत. ४,९८२ ग्राहकांच्या पत्यात दुरुस्ती करण्यात आली आहेत . तर ३४,५६५ ग्राहकांच्या बिलिंग बाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले आहेत. याशिवाय, वीज पुरवठा खंडित होण्याबाबतच्या ८३,९४५ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहेत. २ मे २०२५ ते १० जुलै २०२५ रोजी पर्यंत आपले सरकार पोर्टलवर प्राप्त झालेल्या ३० तक्रारींचे निवारण करण्यात आले असून आपले सरकार पोर्टलवर शून्य तक्रारी शिल्लक आहेत. याशिवाय पीजी पोर्टलवर प्राप्त झालेल्याचार तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून पीजी पोर्टलवर ही शून्य तक्रारी शिल्लक आहेत, अशी माहिती मुख्य अभियंता संजय पाटील यांनी दिली

## माजी सैनिक पाल्य गौरवासाठी ३१ ऑगस्टपर्यंत माहिती द्यावी

**मुंबई : प्रतिनिधी**

माजी सैनिक पाल्य गौरवासाठी माहिती ३१ ऑगस्टपर्यंत द्यावी इयत्ता १० वी व १२ वी मध्ये ९० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त करून उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येक मंडळातील पहिल्या पाच माजी सैनिक,पत्नी यांच्या पाल्यांना रुपये १० हजाराचा विशेष गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे. यासाठी माजी सैनिकांच्या कुटूंबियांनी ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत याबाबत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयास माहिती द्यावी.

आयआयटी, आयआयएम, एम्स अशा नामवंत व ख्याती प्राप्त संस्थामध्ये प्रवेश मिळालेल्या माजी सैनिकाच्या पाल्यांना २५ हजार रुपये विशेष गौरव पुरस्कार देण्यात येईल. तसेच विविध खेळ, साहित्य, संगित, गायन, वादन, नृत्य, यशस्वी उद्योजकाचा पुरस्कार मिळविणारे, संगणक क्षेत्रात अतिउत्कृष्ठ कामगिरी मिळविणारे, नैसर्गिक आपत्तीमध्ये बहुमोल कामगिरी पार पाडणारे, तसेच देश आणि राज्याची प्रतिष्ठा वाढेल अशा स्वरुपाचे लक्षणीय कामगिरी करणारे माजी सैनिक, त्यांच्या पत्नी आणि पाल्य, यांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तरी पात्रता धारक लाभार्थींनी दूरध्वनी क्र ०२२- ३५१८३८६१ / ८५९१९८३८६१ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मुंबई शहर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

## कर्जत इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदी शिल्पा दगडे

**कर्जत : प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब ऑफ कर्जतच्या नवीन २०२५ - २६ वर्षाकरीता पदग्रहण सोहळा नुकताच झाला,क्लबच्या अध्यक्षपदी शिल्पा विजय दगडे यांची निवड करण्यात आली.

रॉयल गार्डनच्या सीबीसी सभागृहामध्ये हा कार्यक्रम झाला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुण्या डॉ.माधवी ठाकूरदेसाई उपस्थित होत्या. दीपप्रज्वलन करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली, प्राची मुसळे यांच्या कृष्णवंदनेनी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.

माजी प्रेसिडेंट सरस्वती चौधरी अहवाल सादर केला,



त्यानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून शिल्पा दगडे, उपाध्यक्षा मोनिका बडेकर, सचिव कश्यपी ठक्कर, खजिनदार वैशाली मुसळे, एडिटर उज्वला पाटील, आय एस ओ ॲड. संजीवनी घुमरे, आय पी पी सरस्वती चौधरी यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्षा शिल्पा दगडे यांनी नवीन वर्षाचे संकल्प सभासदांसमोर मांडले. याप्रसंगी अवंतिका गायकर, उत्तरा वैद्य, पल्लवी सावंत, प्राची चौडिया, मनीषा साबणे, शीतल पाटील, साक्षी अडसूळ, करुणा पराडकर उपस्थित होते.

## वाकस गावासाठी अधिक क्षमतेचे वीज रोहित्र

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ कशेळे राज्यमार्ग रस्त्यावर असलेल्या वाकस गावातील विजेचा प्रश्न मागील काही वर्षे गंभीर होता. कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने स्थानिक ग्रामस्थ यांना वीजच्या समस्येला तोंड द्यावे लागत होते. आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून वाकस गावासाठी २०० केव्हिए क्षमतेचा वीज रोहित्र आणण्यात आला आहे.

वाकस या मोठ्या लोकवस्तीच्या गावाला मागील अनेक वर्षापासून कमी दाबाने वीज पुरवठा होत होता. त्यामुळे स्थानिक ग्रामस्थ हे सतत महावितरण कंपनीकडे पाठपुरावा करीत होते. गावाची वाढलेली लोकसंख्या आणि त्यामुळे वीज पुरवठा वितरित होताना अडचणी येत होत्या. तेथे १०० केव्हीए क्षमतेच्या वीज रोहित्र मधून वीज पुरवठा होत होता. त्यामुळे कमी दाबाने वीज पुरवठा गावात आणखी एक वीज रोहित्र बसवण्यात यावे. यासाठी ग्रामस्थ प्रयत्न करीत होते. शेवटी अनेक वर्षापासून सतावणारा वीजपुरवठ्याचा प्रश्न ग्रामस्थांनी आमदार महेंद्र थोरवे यांना विनंती केल्यानंतर सुटण्याच्या मार्गावर होता.

आमदार थोरवे यांच्याकडून महावितरण कंपनीकडे १०० केव्हीए क्षमतेचे दोन किंवा २०० केव्हीए क्षमतेचा एक वीज रोहित्र बसवून येथील कमी दाबाने होणाऱ्या वीज पुरवठा यांचा प्रश्न मार्गी लावावा. अशी सूचना कार्यकारी अभियंत्यांना केली. त्यानंतर काल वाकस गावासाठी २०० केव्हीए क्षमतेचा नवीन वीज रोहित्र वाकस गावात पोहचले.

आमदार महेंद्र थोरवे यांच्या पाठपुराव्यामुळे २०० केव्हीए क्षमतेचा नवीन वीज रोहित्र बसवण्यात येणार आहे.त्यामुळे आता स्थिर आणि पुरेसा वीजपुरवठा मिळणार असून वारंवार होणाऱ्या कमी दाबाने वीज पुरवठा हा प्रश्न निकाली निघाला आहे. हे वीज रोहित्र वाकस गावात पोहचत असताना सोबत रोशन दळवी, मंगेश वैखरे, कैलास वैखरे आणि धर्मा शेळके हे कार्यकर्ते सोबत होते.

## रेवदंडा बाजारपेठेतील नित्याच्या वाहतूक कोंडीने ग्रामस्थ आणि प्रवासीवर्ग त्रस्त

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बाजारपेठेतील नित्याच्या वाहतुक कोंडीने ग्रामस्थ व प्रवासीवर्ग त्रस्त झाले असून अजवड वाहतुक ही रेवदंडा बायपास मार्गे वळवावी अशी मागणी ग्रामस्थ व प्रवासीवर्ग करत आहेत.

रेवदंडा बाजारपेठतील रस्ता अरूंद असल्याने दोन अवजड वाहने पास होत असताना, वाहन चालकांना जिकीरीचे असते, शिवाय मुरूड पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिध्दीस आल्याने रेवदंडा बाजारपेठेतील वाहतुकीत वाढ झाली आहे. रेवदंडा बाजारपेठेत मुरूड व अलिबाग कडे जा-ये करणार्या लहान मोठया वाहनांची संख्या वाढली असून मिनिटागणीत वाहतुक येथून सुरू असते.

रेवदंडा बाजारपेठेतील रस्ता अरूंद व काही ठिकाणी वळणाचा असल्याने नित्याने वाहतुक कोंडी येथे होते. रेवदंडा बाजारपेठेत अरूंद रस्ताने दोन अवजड वाहने पास होताना, गडबड उडते, परिणामी वेळ लागत असल्याने अवजड वाहनाच्या मागेपूढे वाहनाची लाईन लागून वाहतुक कोंडी निर्माण होते.या वाहतुक कोंडीने वेळेचा अपव्यय निर्माण होतो.

## इंदापूर-वाढवण रस्त्याची चाळण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यात इंदापूर ते वाढवण या सुमारे दीड किलोमीटर अंतरावरील रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय बनली आहे. या मार्गावर ठिकठिकाणी खोल खड्डे पडले असून, या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. त्यामुळे रस्त्याचे मूळ अस्तित्वच हरवले आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने प्रवास अधिक धोकादायक बनला आहे. परिणामी, स्थानिक नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महीला तसेच प्रवासी यांना अक्षरशः तारेवरची कसरत करत हा मार्ग पार करावा लागत आहे.

या मार्गावर अनेक गावे आहेत. हा रस्ता इंदापूर येथे मुंबई गोवा महामार्गाला जोडला जातो तर दुसरा रस्ता माणगाव पुणे या मार्गाला जोडला जातो त्यामुळे या मार्गावरून सतत प्रवासी या रस्त्याचा उपयोग करतात. या गंभीर प्रश्नाकडे पाणसई ग्रामपंचायतचे माजी सरपंच विलास शिंदे यांनी लोकप्रतिनिधी व शासनाचे लक्ष वेधले आहे.

या रस्त्याचा वापर दररोज शेकडो नागरिक करतात. शाळकरी विद्यार्थी वाहनांमध्ये शाळेकडे जाताना होणारी धक्कादायक सफर, तसेच रुग्णवाहिका अथवा आपत्कालीन सेवा यांना होणारा अडथळा ही या रस्त्याच्या दुरवस्थेची जिवंत उदाहरणे आहेत. दुचाकी स्वारांना तर जिवाची पर्वा न करता खड्ड्यांमधून मार्ग काढावा लागतो, त्यामुळे अपघात होण्याचा धोका कायम असतो. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पाणसई ग्रामपंचायतचे माजी सरपंच विलास शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडे पाठपुरावा करत या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे. रस्त्याचे काम मागील काही महिन्यांपासून रेंगाळले असून ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे स्थानिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. असा आरोप त्यांनी केला आहे.

ग्रामीण भागाचा विकास हा रस्त्यांवर अवलंबून असतो. रस्ता नसेल तर शाळा, आरोग्य, व्यवसाय आणि रोजंदारी यावर परिणाम होतो. त्यामुळे या रस्त्याचे काम तत्काळ पूर्ण करणे ही काळाची गरज बनली आहे. प्रशासनाने या समस्येवर लक्ष देणे आवश्यक आहे



## रोहा शहरातील मार्तंड व्यायामशाळा अद्ययावत

### ◆ माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषदेचे मार्तंड व्यायामशाळा माजी आ. अनिकेत तटकरे यांनी अद्ययावत करण्यासाठी लक्ष देऊन मार्तंड व्यायाम शाळेत अत्याधुनिक व्यायाम साहीत्य उपलब्ध करून माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

मार्तंड व्यायाम शाळा अद्यावत केल्यामुळे तरुणांना याचा फायदा होणार आहे.यावेळी मुख्याधिकारी अजयकुमार एडके, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, समिर शेडगे, शहर अध्यक्ष अमित उकडे, शहर अध्यक्षा प्राजक्ता चव्हाण, महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, अहमद दर्जी, नितीन पिंपळे, उपस्थित होते.

## स्व. सार्थक खराडेच्या स्मृतिदिनी विविध कार्यक्रम

**चौक : प्रतिनिधी**

स्व. सार्थक राकेश खराडे याच्या स्मृतिदिन निमित्ताने राकेश खराडे यांच्या सौजन्याने आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ खालापूर यांच्या वतीने समाज उपयोगी कार्यक्रम राबवून सार्थक याला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




रसायनी मोहपाडा येथील पत्रकार राकेश खराडे यांचे पुत्र सार्थक याच्या सहाव्या स्मरणार्थ राकेश खराडे यांच्या सौजन्याने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ खालापूर यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. शिबिराचे उद्घाटन मोहपाडा सरपंच उमा मुंढे यांच्या हस्ते व भूमी अभिलेख कार्यालय अधिक्षक समाधान पाटील, महसूल मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर, रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे यांच्या उपस्थित करण्यात आले.

यावेळी नागरिकांची वैद्यकीय तपासणी, विद्यार्थी यांची आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी करण्यात आली. जनता विद्यालय मोहपाडा या शाळेतील विद्यार्थी यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले.स्पोर्ट विद्यार्थी यांना प्रिंटेड टी शर्ट, तर गरजू विद्यार्थी यांना ड्रेस देण्यात आले. खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी आयुष्मान भारत कार्ड काढण्याचे शिबिर खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांच्या सूचनेनुसार व महसूल मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयुष्मान भारत कार्ड काढण्याचे शिबिर आयोजित करण्यात आले होते, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे व खालापूर अध्यक्ष अर्जुन कदम यांनी सनद धारक यांना खालापूर येथे भूमी अभिलेख कार्यालयात वारंवार जाऊन येणे आर्थिक दृष्ट्या शक्य नव्हते,त्यामुळे तयार असलेल्या सनदा मोहपाडा येथे वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्यांचेही वाटप मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ खालापूर तालुका पत्रकार, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.


## दुखवटा

### ललित मोरे



**उरण** : उरण शहरातील जेष्ठ वृत्तपत्र विक्रेते ललित रघुनाथ मोरे यांचे अल्पशा आजाराने शनिवार (दि.१९) रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्ष होते. त्यांच्या पश्यात पत्नी ,तीन मुलगे,एक मुलगी,नातवंडे,असा मोठा परिवार आहे.ललित मोरे यांचे पुण्यनुमोदन व श्रद्धाजली कार्यक्रम रविवार ( दि. २७ ) जुलै सकाळी ११.३० वाजता त्यांच्या मूळगावी मु.पो.वीर , तालुका महाड,,जि.रायगड येथे होणार आहे.

### हरिश्चंद्र कांबळे



**कर्जत** : तालुक्यातील मोठे वेणगाव मधील सध्या कर्जत शहरात राहणारे हरिश्चंद्र मुरलीधर कांबळे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधन समयी ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक कन्या सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## निवडक

### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**पनवेल :** अज्ञात वाहनाच्या धडकेने एका मोटारसायकल स्वाराचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील पळस्पे गावाच्या ब्रिजवर रोडवर जात असताना घडली आहे. पियुष भगत (वय २०, रा. नांदगाव) हा मोटरसायकल घेऊन कामाच्या ठिकाणी जात असताना त्यास कोणत्यातरी अज्ञात वाहनांची ठोकर लागून झालेल्या अपघातात तो गंभीररित्या जखमी होऊन मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### उलवे येथून एक जण बेपत्ता



**पनवेल :** बाथरूमला जातो असे सांगून घराबाहेर पडलेला एक इसम अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार उलवा पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. फाते गोसाय हेम्ब्रम, (वय ३०, रा. उलवे) असे या व्यक्तीचे नाव असून उंची ४.५ इंच, केस काळे मध्यम, दाढी वाढलेली, मिशी मध्यम, अंगात नेसून लाल रंगाचा टी शर्ट व काळया रंगाची पॅन्ट, पायात काळयाची रंगाची चप्पल, भाषा-हिंदी बोलतो या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने उलवा पोलीस ठाणे किंवा पोहवा विशाल पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पेठगाव येथे रिक्षाची चोरी

**पनवेल :** राहत्या घरासमोर उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना पेठगाव येथे घडली आहे. मुस्तकीम अवालिया शेख यांनी त्यांची ५०,००० रुपये किमतीची बजाज कंपनीची रिक्षा (एमएच ४६ एझेड ७७५५) ही राहत्या घरासमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेल मनपा लोकशाही दिन

**पनवेल :** महापालिकेमार्फत आयुक्तांचे अध्यक्षतेखाली प्रत्येक महिन्याचा पहिला सोमवार किंवा या दिवशी सुट्टी असल्यास, त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवशी लोकशाही दिन आयोजित करण्यात येत आहे. पनवेल महापालिका मुख्यालयात पुढील ऑगस्ट महिन्याच्या ४ तारखेला लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार आहे. लोकशाही दिनामध्ये सहभाग घेण्यासाठी नागरिकांनी अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. तसेच तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

### सॅनिटरी नॅपकिनचे मोफत वाटप



**खारघर :** कोपरा येथील सुधागड शाळेमध्ये बुधवारी (दि.२३) पर्यावरण पूरक सॅनिटरी नॅपकिनसचे मोफत वाटप करण्यात आले. १२२ मुलींनी या सेवेचा लाभ घेतला. या वेळी डॉ अमोघ शहाणे यांनी मुलींना मासिक पाळी आणि त्याबाबत घेण्याची काळजी, स्वच्छता, आरोग्य या विषयी माहिती दिली. तसेच पर्यावरण पूरक सॅनिटरी नॅपकिनसचे महत्व सांगितले. या वेळी अध्यक्ष डॉ.रविकिरण, डॉ.अमोघ शहाणे, डॉ.कोमल गुंडेवार, संजय गुप्ता, अर्पण रॉय, भरत, दिपा, दीप्ती, शीतल उपस्थित होते.

### अनिल ठकेकर अध्यक्षपदी



**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचा नुकताच पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. रोटरी प्रांत थ्री वन थ्री वन चे नियोजित प्रांतपाल चारु श्रोत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला. या वेळी अनिल ठकेकर यांची क्लबच्या अध्यक्षपदी, तर अतिश थोरात यांची सचिवपदी निवड करण्यात आली. त्याचबरोबर इतर पदाधिकाऱ्यांनीही आपापल्या पदाची सूत्रे स्वीकारली. या पदग्रहण सोहळ्याला माजी प्रांतपाल डॉक्टर गिरीश गुणे, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, रोटरी प्रांत थ्री वन थ्री वनचे फाउंडेशन डायरेक्टर राजेश राऊत, सहाय्यक प्रांतपाल डॉ. स्वाती लिखिते यांच्यासह रोटरीचे सदस्य उपस्थित होते.

### पोलिसांसाठी आरोग्य शिबिर

**पनवेल :** मानवता फाऊंडेशनच्या माध्यमातून पोलीस बांधवांच्या साठी आज भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ शेकडो पोलीस बांधवानी घेतला. क्लाउडनाइन हॉस्पिटल नेरूळ व मानवता फाउंडेशन नवी मुंबई यांच्या सहकार्याने सर्व पोलिसांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी अध्यक्ष संजय पवार कार्याध्यक्ष अभिजित सांगळे, खजिनदार शीतल मोरे, महाराष्ट्र अध्यक्ष स्वाती पांचाळ, उपाध्यक्ष संजय कामदार, आदेश सिंग, प्रवीण खंदारे, साहिल शेजुल, क्लाउड नाइन हॉस्पिटल चे नागेंद्र यादव, वैभव जाधव उपस्थित होते. पोलिसांनी आपल्या आरोग्यविषयक विविध तपासण्या करून घेतल्या तसेच तज्ञ डॉक्टरांकडून उपचाराचे मार्गदर्शन घेतले.



# तोतया पोलिसांचा सुळसुळाट

## दोन ज्येष्ठांना लुबाडले



**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणाऱ्या भामटयांनी एका दिवसामध्ये पनवेल व खारघर या भागातील दोन ज्येष्ठ नागरिकांजवळचे तब्बल लाखो रुपये किमतीचे दागिने लुबाडल्याचे उघडकीस आले आहे. या तोतया पोलिसांविरोधात पनवेल शहर, खारघर पोलिसांनी गुन्हे दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

पनवेलच्या बावन बंगलो येथे राहणारे नरेश मिराई (वय ७३) हे फेरफटका मारण्यासाठी गेले होते. या वेळी दोघा भामट्यांनी सीआयडी अधिकारी असल्याचे भासवून बाहेर भुरटे चोर फिरत असल्याचे सांगून घाबरवत अंगावरील दागिने काढून ठेवण्यास सांगितले. नरेश मिराई यांनी सोन्याची चेन तसेच दोन अंगठ्या काढल्यानंतर हे दागिने त्यांच्या खिशात ठेवण्याचा बहाणा करून दागिने काढून घेत ते दुचाकीवरून पसार झाले. तर दुसऱ्या घटनेत सातारा येथे राहणारे विश्वनाथ कदम (वय ७८) हे खारघर येथे राहणाऱ्या मुलाकडे काही दिवसांपूर्वीच आले होते. ते घराबाहेर फिरायला गेले होते.

खारघर सेक्टर-७ मधील जीएसटी कॉलनी रोडने पायी चालत जात असताना, तिघा भामट्यांनी पोलीस असल्याचे भासवून त्या भागात चोऱ्यामाऱ्या होत असल्याचे सांगून त्यांना अंगावरील दागिने काढण्यास सांगून त्यांनी हातातील सोन्याची अंगठी काढली असता, तोतया पोलिसांनी हातचलाखी करून त्यांची अंगठी चोरून पलायन केले.

**ट्रेडिंगच्या बहाण्याने २.२९ कोटींचा गंडा**

ऑनलाईन ट्रेडिंगच्या माध्यमातून फसवणुकीच्या घटना सातत्याने घडत आहेत. त्यातच बेलापूर परिसरात राहणाऱ्या ४३ वर्षीय उद्योजक महिलेची दोन कोटी २९ लाखांची फसवणूक झाली आहे. उद्योजक महिलेची दोन कोटी २९ लाखांची फसवणूक झाली आहे. ऑनलाइन गुंतवणुकीतून अधिकाधिक नफ्याचे आमिष दाखवून त्यांची हि फसवणूक झाली आहे. याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस अधिक तपास करत आहेत.

# मंदिरांमध्ये चोरी करणारा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील तक्का गाव येथील श्री साईबाबा मंदिर तसेच चिंचपाडा येथील विठ्ठल मंदिरात चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे.



तक्का गाव येथील श्री साईबाबा मंदिर येथे चोरी करून सात हजार रुपये रोख रक्कम तसेच विठ्ठल मंदिरात चोरी करून तेथील समई व घंटा असा मिळून ३८ हजार रुपयांचा ऐवज चोरल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक प्रवीण फडतरे, हवालदार तुषार बोरसे, संदेश म्हात्रे, महेश पाटील यांनी तांत्रिक तपास व गुप्त बातमीद्वारा आरोपी राहुल मोरे याला ताब्यात घेतले असता त्यांनी दोन्ही गुन्ह्याची कबुली दिली आहे. याबाबत पुढील तपास पोहवा पवार करीत आहेत.

# सुधारित पीक विम्याबाबत आवाहन

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील शेतकऱ्यांना सुधारित पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२५पर्यंत अंतिम मुदत असून, त्यासाठी फार्मर आयडी आणि ई पीक पाहणी बंधनकारक राहील, असे तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ - नारनवर यांनी कळविले आहे. या योजनेत कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक असून ईपीक पाहणी आणि विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल आणि भरलेला विमा हप्ता जप्त केला जाईल.

विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिलेले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत सीएससी विभागास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी चालकांना देऊ नये. एखाद्या अर्जदारांनी बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान पाच वर्ष काळ्या यादीत टाकून, शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिला जाणार नाही. मंजूर नुकसान भरपाई अर्जदार यांचे आधार संलग्न बँक खात्यात थेट केंद्र शासन पोर्टल वरून जमा करण्यात येणार आहे. महत्त्वाचे असे की, या योजनेत सर्व पिकांसाठी जोखीम मस्तर ७० टक्के आहे. विमा संरक्षणासाठी रायगड जिल्ह्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनी या विमा कंपनीची निवड झाली आहे. विमा संरक्षित रक्कम भात पिकासाठी विमा हेक्टरी ६१ हजार असून विमा हप्ता रक्कम ४५७ प्रति हेक्टरी आहे, अशी माहिती उरण तालुका कृषी विभागाकडून प्राप्त झाली आहे.

# पावसाळी स्थलांतरित होण्यासाठी डुंगी ग्रामस्थांना सिडकोकडून मदत

**पनवेल : वार्ताहर**

सिडकोकडून तालुक्यातील डुंगी ग्रामस्थांना चार महिने पावसाळी स्थलांतरित होण्यासाठी घरभाडे पोटी धनादेश वाटप करण्यात आले. एकूण ११३ कुटुंबियांना वाटप करण्यात आले सिडकोतर्फे धनादेशाचे वाटप खासदार श्रीरंग बारणे यांच्या सूचनेनुसार व पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांच्या प्रयत्नाने करण्यात आले.

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या शिफारी नुसार सिडको नवी मुंबई यांना सुचित करण्यात आले होते. त्यानुसार मौजे पारगाव डुंगी या गावाला तहसीलदार विजय पाटील यांच्या सुचनेनुसार तसेच सदस्य जिल्हा विकास



समन्वय व स नियंत्रण समिती दिशा तथा पारगावच्या माजी सरपंच अहिल्या बाळाराम नाईक यांच्या पाठपुराव्याला यश येऊन मौजे डुंगी येथे धनादेशाचे वाटप करण्यात आले.

दरवर्षी पावसाळ्यात पुराच्या पाण्यामुळे ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात बांधकामाचे तसेच सामानाचे नुकसान होत आहे. चार महिन्याचे स्थलांतरा होण्यासाठी सदर नुकसानापोटी सिडको महामंडळ तर्फे ग्रामस्थांना चार महिन्याच्या स्थलांतरिता होण्यासाठी घर भाड्यापोटी ५० हजार रुपये दिले जातात.

धनादेश तहसीलदार पनवेल यांच्या कार्यालयामार्फत आज ग्रामपंचायत पारगाव येथे ११३ कुटुंबाना वाटप करण्यात आले. या वेळी प्रशासकीय अधिकारी संतोष ठोंबरे, ग्रामसेविका सौ वानखेडे, माजी उपसरपंच निशा पाटील, मनोज दळवी, तलाठी क्षमा पवार, बाळासाहेब नाईक, प्रमोद नाईक, पोलीस पाटील श्रीधर पाटील व ग्रामपंचायत कार्यालयातील क्लार्क प्रमोद म्हात्रे उपस्थित होते.

# लोकमान्य टिळकांच्या जयंतीनिमित्त बालसभा भरली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका शाळांमध्ये विविध उपक्रम राबविले जातात. बुधवारी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महान क्रांतिकारक लोकमान्य टिळक यांच्या १६९व्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिकेतील सर्व शाळांमध्ये बालसभेचे आयोजन करण्यात आले.

यानिमित्ताने पनवेल महानगरपालिका शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या सूचनेनुसार शालेय स्तरावर बालसभेंतर्गत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी सर्व शाळांमध्ये लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी बालसभेंतर्गत वक्तृत्व स्पर्धेमधून लोकमान्य टिळक यांच्या जीवनकार्याचा परिचय आपल्या भाषणांमधून करून दिला.

याबरोबरच शिक्षकांनीदेखील लोकमान्य टिळकांचे स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदान व समाजकार्य कथारूपाने सांगितले. बालसभेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळण्यास मदत झाली.

# रॅपिड ॲक्शन फोर्सची पनवेल शहर पोलीस ठाण्याला भेट

**पनवेल : वार्ताहर**

रॅपिड ऍक्शन फोर्स तळोजाच्या क्यूआरसीएस मोहिमेंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाण्याला भेट दिली आहे.

रॅपिड ऍक्शन फोर्स तळोजा येथील कंपनीने क्यूकिक रिस्पॉन्स इन क्रिटिकल सिश्युवेशन मोहिमे अंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाण्याला भेट दिली. या वेळी आरएएफ कंपनीचे एक डेप्युटी कमांडर, एक असिस्टंट डेप्युटी कमांडर, सात पोनि, ५१ अंमलदार तसेच पोलीस ठाण्याकडे दोन पोनि, दोन सपोनि/पोउपनि, १५ अंमलदार उपस्थित होते, या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या बरोबर संबंधित अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यस्थेसंदर्भात चर्चा केली.







**कळंबोली :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदानाचा संकल्प करत कळंबोली येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित राहून रक्तदात्यांना प्रमाणपत्राचे वाटप केले व सर्वांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर अरुण पाटील, माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीचा पदग्रहण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**





इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी या संस्थेने यंदा पाचव्या वर्षात पदार्पण केले असून बुधवारी (दि.२३) संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा प्रमुख पाहुणे व क्लबच्या सदस्यांच्या उपस्थितीत नवीन पनवेल येथील आर.जे. शंकरा आय हॉस्पिटलच्या सेमिनार हॉलमध्ये झाला.

अतिथी अर्चना परेश ठाकूर तसेच ममता प्रितम म्हात्रे यांचे स्वागत करण्यात आले. क्लबच्या भूतपूर्व अध्यक्ष प्रतिभा डांगी यांनी प्रामुख्याने सहभागी असलेले कार्यकारिणी मंडळ, क्लबचे सदस्य तसेच परिवारातील सदस्यांचे मनापासून आभार व्यक्त केले व नवनिर्वाचित अध्यक्ष व कार्यकारिणीला त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन आपल्या कार्यकाळात त्यांनी केलेल्या विविध सामाजिक कार्याचे पीपीटीच्या माध्यमातून सादरीकरण केले.

यात त्यांनी मागील वर्षभरात विविध अनाथाश्रम व वृद्धाश्रमा ना दिलेली मदत, विविध शाळा कॉलेजातील मुलांसाठी केलेली वेगवेगळ्या स्वरूपातील मदत, वैदयकीय मदत इ. अनेक अशा एकुण ५९ उपक्रमांची माहिती दिली. नवीन कार्यकारिणी अध्यक्ष सिंपल आचलिया यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते कॉलर व पीन प्रदान करून क्लबचा कार्यभार सोपविण्यात आला. सर्व कार्यकारिणी मंडळाने हातात आपापल्या पोस्टनुसार बॅनर घेऊन संगीताच्या तालावर स्टेजवर उत्साहपूर्वक पदार्पण केले. त्यानंतर वाईस प्रेसिडेंट नम्रता बांठिया, आयपीपी प्रतिभा डांगी, सेक्रेटरी युक्ती शहा, खजिनदार ममता ठाकूर, आयएसओ स्नेहल कल्याणकर, एडिटर मौसमी गोगुला, सीसी प्रिया चतुर्वेदी, प्रोजेक्ट चेअरमन ध्वनी तन्ना, जॉईंट सेक्रेटरी वैशाली कटारिया, कार्यकारिणी सदस्य हेतल बालड, विजयता कोठारी, बिजल मिरानी या सर्वांचेदेखील प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पिनिंग करून पदग्रहण करण्यात आले. तसेच नवीन सदस्यांना क्लबच्या चार्टर अध्यक्ष हेतल बालड यांच्या हस्ते शपथ देऊन त्यांचे क्लबमध्ये स्वागत करण्यात आले.

नवनिर्वाचित अध्यक्ष सिंपल आचालिया यांनी सभागृहाला उद्देशून आपल्या भावना तसेच त्यांच्या कार्यकाळात समाज कार्याचा त्यांनी आखलेला आराखडा उपस्थितांसमोर मांडला. प्रमुख अतिथी अर्चना ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त करून सिंपल व क्लबच्या सदस्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. एडिटर मौसमी गोगुला त्यांच्या कार्यकाळातील प्रथम बुलेटीन व सीसी प्रिया चतुवैदी यांच्या फेलोशिप डायरीचे विमोचन करण्यात आले.

या वेळी दरवर्षीप्रमाणे जे प्रोजेक्ट केले जातात त्यात प्रामुख्याने पेण येथील आई डे केअर या गतिमंद मुलांच्या शाळेला अर्चना ठाकूर, ध्वनी तन्ना, स्नेहल कल्याणकर या तीन दात्यांच्या मदतीने तीन मुलांच्या वार्षिक शिक्षणाचा भार उचलण्याच्या हेतूने ४५ हजार रुपये चेक स्वरूपात देण्यात आले तसेच आर.जे.शंकरा हॉस्पिटलला उषा कंपनीचे शिलाई मशीन विजयता कोठारी यांच्याकडून देण्यात आले, जेणेकरून हॉस्पिटलच्या शिवणकामासाठी बाहेर होणारा खर्च वाचून तो गरजूंच्या इलाजासाठी वापरता येईल. पर्यावरणाला अनुकूल असा आणखी एक क्लबचे लोगो छापलेला कापडी पिशव्या वितरणाचा तिसरा उपक्रम राबविण्यात आला. सूत्रसंचालन ध्वनी व जयश्री मंगलानी यांनी केले.

## संपादकीय

# दुरुस्तीला विरोध कशासाठी?

निवडणूक आयोग बिहारमध्ये मतदारयादीबाबत विशेष पुनरीक्षण मोहीम राबवत आहे. तेथील मतदारयादीत असंख्य परदेशी नागरिकांची नावे असल्याची माहितीही समोर आली आहे. अपात्र मतदारांना वगळून मतदारयादी दुरुस्त करण्याबद्दल वास्तविक कुणाचेच दुमत असता कामा नये. बिहारमध्ये मोहिमेत आलेल्या अडचणी लक्षात घेऊन सुलभ पद्धती स्वीकारली जाईल.

**बिहारमध्ये मतदार यादीची विशेष पुनरावलोकन प्रक्रिया सुरू आहे. निवडणूक आयोगाकडून राबवल्या जाणाऱ्या या मोहिमेला विशेष पुनरीक्षण मोहीम म्हणजेच स्पेशल इन्टेन्सिव्ह रिव्हिजन (एसआयआर) असे संबोधले जाते. जून महिन्यात या मोहिमेची घोषणा झाल्यापासून या प्रक्रियेवर विरोधकांकडून अनेक आक्षेप घेतले जात आहेत. याच मुद्यावर विरोधक संसदेतही गदारोळ करीत आहेत. वास्तविक यापूर्वी वर्षानुवर्षे मतदारयादीमधील चुका तशाच राहून गेल्या आहेत. आता त्या दुरुस्त करण्याचे काम निवडणूक आयोगाने हाती घेतले आहे तर त्याविषयी शंका उपस्थित केल्या जात आहेत. २००३ नंतर प्रथमच असे पुनरीक्षण होते आहे. मतदारांचे नागरिकत्व आणि पात्रता तपासण्याचे आयोगाचे कर्तव्य असल्याचे निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे. त्याचे पुरावे सादर केल्यावरच मतदानाचा हक्क मिळू शकतो अशी भूमिका निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात मांडली. या पुराव्यांच्या तपासणीचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे याबाबत कुणाचेच दुमत असणार नाही. सर्वोच्च न्यायालयानेही अशी मोहीम राबवण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार मान्य केला. तसेच ही प्रक्रिया थांबविण्यास नकार दिला. परंतु मतदार ओळखपत्र, आधार कार्ड आणि रेशनकार्ड हे ओळखीचा पुरावा म्हणून गृहित धरले जावे असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. निवडणूक आयोगानेही त्यानंतर काही अटी शिथिल केल्या व ही कागदपत्रे स्वीकारणे सुरू केले. या प्रकरणीची अंतिम सुनावणी २८ जुलै रोजी होणार आहे. मतदारयाद्यांमध्ये ज्यांची नावे २००३ पूर्वीपासून आहेत, त्यांना पुरावे देण्याची गरज पडणार नाही. परंतु बिहारमध्ये अनेक अशिक्षित नागरिकांकडे ओळखीचा कुठलाही पुरावा नाही. प्रचंड संख्येने या राज्यातील लोक स्थलांतर करून अन्य राज्यांमध्ये उपजीविकेसाठी गेलेले आहेत. त्यांच्यापर्यंत ही मोहीम पोहोचवावी कशी हा प्रश्नही होताच. या मोहिमेत मतदारयादीतील १८ लाख जण मृत असल्याचे आढळले आहे. २६ लाख मतदार स्थलांतरित आहेत तर सात लाख मतदारांची नावे अन्य राज्यांच्या मतदारयादीत दुबार असल्याचे आढळले आहे. यातील मृत मतदार वगळले जाण्याबद्दल कुणाला काही आक्षेप असण्याचे कारण नाही. परंतु पुरावे देण्यास असमर्थ असलेल्यांची नावे यादीतून वगळली जात असल्याने त्याविषयी अस्वस्थता दिसते आहे. सुरुवातीला आयोगाने २००३ नंतर नावे नोंदवलेल्या मतदारांकडून जन्मनोंदणी प्रमाणपत्रांसोबत आईवडिलांचे दाखले देणे बंधनकारक केले होते. मतदार ओळखपत्र, आधार कार्ड आणि रेशनकार्ड यांसारखे दस्तावेज हे ओळखीचा पुरावा मानण्यास निवडणूक आयोगाने नकार दिला होता. बिहारमध्ये जवळपास निम्म्या नागरिकांकडे आयोगाने मागितलेल्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाही अशी परिस्थिती आढळून आली. त्या राज्यात जन्म नोंदणीचे प्रमाणही जेमतेम ७० टक्के आहे. बिहारची विधानसभा निवडणूक दिवाळीनंतर ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात होणे अपेक्षित आहे. या निवडणुकीच्या तोंडावर पावसाळ्यात अवघ्या महिन्याभरात पुनरीक्षणाची प्रक्रिया पार पाडली जात असल्याबद्दल विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला आहे. निवडणूक सुधारणा ही एक सतत चालणारी प्रक्रिया असून त्यातून आपली लोकशाही अधिक सक्षमच होणार आहे हे विरोधकांनी लक्षात घेण्याची गरज आहे.**

# मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष अनेकांसाठी 'जीवनदायी'

आपल्या समाजात अनेक कुटुंबे अशी आहेत, ज्यांना अचानक उद्भवलेल्या गंभीर आजारामुळे किंवा अपघातामुळे मोठे वैद्यकीय खर्च करावे लागतात. अशा वेळी आर्थिक अडचणींमुळे अनेकांना योग्य उपचार मिळविणे कठीण होते. याच गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष (Chief Minister Medical -ssistance Cell) सुरू केला आहे. हा कक्ष खऱ्या अर्थाने अनेकांसाठी 'जीवनदायी' ठरत आहे, आणि यामागे एक सुव्यवस्थित यंत्रणा कार्यरत आहे.




**मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे उद्दिष्ट आणि कार्यक्षेत्र :**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा मुख्य उद्देश हा राज्यातील गरजू नागरिकांना दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे. या निधीतून केवळ वैद्यकीय मदतच नाही, तर नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या नागरिकांनाही आर्थिक सहाय्य पुरविले जाते. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी प्रयत्न केले जातात. मुख्यमंत्री सचिवालयाच्या दि. १३ ऑगस्ट २०१५ च्या परिपत्रक क्र. मुमंसनि–२०१५/प्र.क्र.१/निधी कक्षनुसार गेल्या काही वर्षांपासून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष कार्यरत असून या कक्षाच्या माध्यमातून हजारो रुग्णांना उपचार मिळाले आहेत.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची (Chief Minister's Relief Fund and Charitable Hospital -ssistance Cell) उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेतः

आर्थिक दुर्बल रुग्णांना वैद्यकीय मदत पुरविणेःराज्यातील गरीब व गरजू नागरिकांना महागड्या व जीवनावश्यक उपचारांसाठी आर्थिक सहाय्य देणे (जसे को कर्करोग, हृदयरोग, किडनी प्रत्यारोपण, इत्यादी).

धर्मादाय रुग्णालयांमधील सुविधा वाढविणेः राज्यातील धर्मादाय (Charitable) रुग्णालयांना आवश्यक वैद्यकीय उपकरणे, औषधे किंवा सुविधा निर्माण करण्यासाठी सहाय्य करणे.

सरकारी आणि खासगी यंत्रणांमधील समन्वयःवैद्यकीय मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालयांमधील सेवा एकत्रित करून नागरिकांना सुलभ सेवा देण्याचा उद्देश.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीच्या योग्य आणि पारदर्शक वितरणासाठी राज्य आणि जिल्हास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्या निधीचा वापर योग्य गरजूंपर्यंत पोहोचतो की नाही याची खात्री करण्यासाठी नेमण्यात आल्या आहेत.

**राज्यस्तरीय समिती (मंत्रालय स्तर)**

राज्यस्तरीय समिती ही मुख्यमंत्री सहायता निधीच्या व्यवस्थापनाची आणि धोरणात्मक निर्णयांची शिखर संस्था आहे. मुख्यमंत्री कार्यालयाच्या अखत्यारित हा कक्ष कार्य करतो.

**प्रमुख कार्ये:**

* निधीच्या वितरणाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.
* मोठ्या आर्थिक मदतीसाठीच्या अर्जांचे पुनरावलोकन करणे.
* राज्यभरातील निधीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे.
* नवीन आजार किंवा उपचारांचा निधीसाठी समावेश करण्याबाबत विचार करणे.
* राज्यातील सर्व जिल्हास्तरीय कक्षांशी समन्वय साधणे.

राज्यातील गरजू रुग्णांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत पुरविली जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यासंदर्भात दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी शासन निर्णय काढण्यात आला. शिवाय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाची दि.२३ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली होती, या बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणेबाबत निर्देश दिले होते.

वैद्यकीय उपचासाठी मदत मिळावी, याकरिता गरजू रूग्ण व त्यांचे नातेवाईक मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे मोठ्या प्रमाणात अर्ज करत असतात. अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी ते मंत्रालयात वारंवार येतात. रूग्ण व नातेवाईकांना होणारा त्रास लक्षात घेवून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून रूग्ण व नातेवाईकांची परवड थांबविण्याच्या उद्देशातून हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमध्ये रुग्णालय अंगीकृत करण्याची प्रक्रिया आणि मुख्यमंत्री वैद्यकीय अर्थसहाय्य वितरीत करणे, या दोन्ही प्रक्रिया संपूर्णतः निःशुल्क आहेत.

नागरिकांची सोय लक्षात घेऊन, अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष सुरू करण्यात आले आहेत. यामुळे अर्जदारांना मंत्रालयात जाण्याची गरज राहिलेली नाही, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचतो. जिल्हास्तरीय समिती ही स्थानिक पातळीवरच्या गरजा आणि अर्जदारांना तत्काळ मदत देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**प्रमुख कार्ये:**

* जिल्ह्यातील मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीसाठीचे अर्ज स्वीकारणे.
* अर्जांची प्राथमिक पडताळणी करणे आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता तपासणे.
* लहान किंवा कमी गुंतागुंतीच्या वैद्यकीय प्रकरणांमध्ये त्वरित निर्णय घेऊन निधी मंजूर करणे.
* आवश्यकतेनुसार, अर्ज राज्यस्तरीय समितीकडे शिफारशीसाठी पाठवणे.
* रुग्णालयांशी समन्वय साधणे आणि उपचारांच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे.
* स्थानिक गरजू रुग्णांना निधी योजनेची माहिती देणे आणि अर्ज भरण्यास मदत करणे.

ही प्रक्रिया अधिकाधिक कागदविरहित करण्याचा प्रयत्न केला जात आहे, ज्यामुळे अर्जदारांना अधिक सुलभपणे मदत मिळू शकेल.

**कोणत्या आजारांसाठी किती मदत? (आर्थिक मदतीची मर्यादा)**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून विविध दुर्धर आणि महागड्या आजारांसाठी आर्थिक मदत दिली जाते. या मदतीची रक्कम आजाराची तीव्रता, उपचाराचा खर्च आणि आवश्यकतेनुसार ठरवली जाते. साधारणतः, प्रत्येक आजारासाठी निश्चित केलेली कमाल मर्यादा असते, जी खालीलप्रमाणे असून ही माहिती बदलू शकते, अद्ययावत माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळही तपासावे.

मात्र राज्याबाहेरील रुग्णालयांवर महाराष्ट्र शासनाचे यंत्रणांचे नियंत्रण नसते. तसेच त्यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेणे शक्य होत नसल्यामुळे राज्याबाहेरील रुग्णालयांना अर्थसहाय्य प्रदान करण्यास प्रतिबंध करण्यात आलेले आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय समितीच्या शिफारशीनुसार रुपये २५ हजार, ५० हजार, १ लक्ष आणि महत्तम रुपये २ लक्ष आजारांनिहाय मर्यादित रक्कम प्रदान करण्यात येते.

**पात्रतेचे निकष आणि आवश्यक कागदपत्रे:**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा लाभ घेण्यासाठी काही पात्रता निकष आणि आवश्यक कागदपत्रे आहेत:

* उत्पन्नाचा दाखला: अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १.६० लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. (तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.)
* आधार कार्ड: रुग्णाचे महाराष्ट्र राज्याचे आधार कार्ड. लहान मुलांसाठी आईचे आधार कार्ड आवश्यक.
* रेशन कार्ड: रुग्णाचे महाराष्ट्र राज्याचे रेशन कार्ड (केशरी किंवा पिवळ्या रंगाचे).
* वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक/प्रमाणपत्र: डॉक्टरांच्या सही–शिक्क्यानिशी मूळ वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक किंवा प्रमाणपत्र. खाजगी रुग्णालयाच्या बाबतीत, हे प्रमाणपत्र सिव्हील सर्जन यांनी प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.
* प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी: नढउउ (झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर) किंवा शासकीय समितीची मान्यता आवश्यक.
* रुग्णालयाची नोंद: उपचार घेत असलेल्या रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. (फक्त नोंदणीकृत रुग्णालयेच मदत निधीसाठी पात्र असतात.)

**–मनोज सानप**
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

## बदलते तंत्रज्ञान

# बिनधास्त घ्या आयफोन केवळ 'इतक्या' हजारात

स्मार्टफोन बाजारात ॲपल आयफोनची वेगळीच क्रेझ आहे. सर्वांची इच्छा असते की आपल्याकडेही आय फोन असावा. मात्र, किमती जास्त असल्यामुळे अनेक जण आयफोन खरेदी करणे टाळतात. पण, आता अशा लोकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. कारण तुम्हाला आयफोन कमी किमतीत खरेदी करण्याची सुवर्णसंधीच आहे. तुम्ही आता स्वस्तात आयफोन खरेदी करू शकता, पण नेमके कसे, चला तर मग जबरदस्त ऑफर्सबद्दल सविस्तर जाणून घेऊया



आयफोन हा जगातील सर्वात जास्त विकल्या जाणाऱ्या स्मार्टफोनपैकी एक आहे. भारतीय स्मार्टफोन मार्केटमध्ये आयफोनला मोठी मागणी देखील आहे. जबरदस्त लूक, स्पेसिफिकेशन्स, सिक्युरिटी फीचर्समुळे पल आयफोनची किंमतदेखील तेवढीच महाग आहे, त्यामुळे पैशांअभावी अनेक जण हा महागडा स्मार्टफोन खरेदी करू शकत नाहीत. परंतु, आता तुमच्यासाठी आनंदाची बातमी आहे. आय फोन १६ वर जबरदस्त ऑफर दिली जात आहे. या ऑफरअंतर्गत तुम्ही हा फोन कमी किमतीमध्ये खरेदी करू शकणार आहात. चला तर जाणून घेऊया कुठे मिळतेय ही भन्नाट ऑफर.

तुम्हीदेखील –आय फोन घेण्याच्या प्रतीक्षेत आहात का? मग ही बातमी तुमच्यासाठी खूपच खास आहे. ॲपलने नुकतेच आय फोन १६ वर जबरदस्त सूट जाहीर केली असून, आता तुम्हाला हा हाय–एंड स्मार्टफोन तब्बल ९,९०१ रुपयांच्या सवलतीसह मिळू शकतो. सध्या आय फोन १६ व्हेरिएंट फ्लिपकार्टवर फक्त ६९,९९९ रुपयांमध्ये उपलब्ध आहे, ज्याची मूळ किंमत ७९,९०० होती. विशेष म्हणजे ही सवलत कोणत्याही बँक ऑफरशिवाय आणि एक्स्चेंजशिवाय सगळ्यांसाठी खुली आहे.

**सवलतीबरोबर मिळतोय आणखी फायदा!**

फ्लिपकार्टवर वर तुम्ही जुना स्मार्टफोन एक्स्चेंज केल्यास ४५,१५० रुपयांपर्यंत अतिरिक्त सूट मिळू शकते. अर्थात, ही एक्स्चेंज व्हॅल्यू तुमच्या जुन्या फोनच्या स्थितीवर आणि लोकेशनवर अवलंबून असेल. तसेच, फ्लिपकार्ट ॲक्सिस बॅक क्रेडिट कार्डने खरेदी केल्यास पाच टक्के आणि ॲक्सिस युपीआय सुपर मनी वापरून पेमेंट केल्यास ५०० रुपयांपर्यंत कॅशबॅक देखील मिळणार आहे.

# अभिजात संगीतकार सुधीर फडके

## निमित्त



सुधीर फडके हे मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध गायक, संगीतकार होते. ते विशेषत: मराठी सुगम संगीतासाठी प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म २५ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर येथे झाला. फडके यांनी अनेक अजरामर गीते संगीतबद्ध केली आहेत. त्यांची अनेक भक्तीगीते, सुगम संगीत आणि चित्रपट गीते प्रचंड लोकप्रिय आहेत. कवी ग.दि. माडगूळकर लिखित गीतरामायणाला फडके यांनी संगीत दिले.ते खूप लोकप्रिय झाले. फडके यांनी यातील सर्व ५६ गाणी संगीतबद्ध केली. सुधीर फडके यांनी वामनराव पाध्ये यांच्याकडून शास्त्रीय गायन संगीताचे प्रारंभिक प्रशिक्षण घेतले. त्यांनी १९४१ मध्ये आपल्या संगीत कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर पाच वर्षांनी ते प्रभात फिल्म कंपनीत संगीत दिग्दर्शक म्हणून रुजू झाले.

एच.एम व्ही. कंपनीत त्या काळी अनेक प्रतिभावंत येत असत. हिराबाई बडोदेकर, माणिक दादरकर, वासंती, पद्मा पाटणकर (याच पद्मा पाटणकर पुढे सौ. गदिमा झाल्या), सरस्वती राणे, जे. एल. रानडे, यांच्या साठी गाणी करण्याची संधी बाबूजींनी याच काळात घेतली. हिराबाई बडोदेकर यांना ते गुरुस्थानी मानत. पण त्यांनी सर्व समजून संगीतकार म्हणेल त्या पद्धतीने गाणी रेकॉर्ड केली, हे बाबूजी आदरपूर्वक नमूद करतात. 'विनवीत शबरी रघुरायाला' आणि 'नाच रे ब्रिजलाला' ही हिराबाईंची गाणी खूप लोकप्रिय झाली होती. एच.एम.व्ही.शी निर्माण झालेल्या या संबंधामुळे एक दिवस त्यांचा संबंध 'प्रभात'शी आला. संगीतकार बाबूजींचा पहिला चित्रपट होता– 'गोकुल'! आणि येथूनच बाबूजींची संगीतकार म्हणून प्रतिमा तयार झाली. 'रुक्मिणी–स्वयंवर', आगे बढो', सीता स्वयंवर, संत जनाबाई इत्यादी चित्रपटामुळे ते प्रकाशात आले.

फडके यांनी २१ हिंदी चित्रपटांसह १११ चित्रपटांना संगीत दिले. रुक्मणी स्वयंवर, वंदे मातरम, निरुपमा आणि परिराणी, दोस्त असा तर असा, शापित, चोराच्या मनात चांदणे, आधार, बाजीरावांचा बेटा, जावई विकत घेणे आहे, अनोळखी, कार्तिकी, या सुखानो या, जोतिबाचा नवस, आराम हराम आहे, आपले दात आपले ओठ, थोरली जाऊ, पुढचं पाऊल आणि धाकटी सून हे त्यांनी संगीत दिलेले काही चित्रपट आहेत.

संगीत दिग्दर्शनासोबतच सुधीर फडके यांनी नरवीर तानाजी, पोस्टातील मुली, आंधळा मागतो एक डोळा, जगाच्या पाठीवर, ते माझे घर, आम्ही जातो आमच्या गावा यांसारख्या चित्रपटांमध्ये गायन केले. त्यांनी 'मराठा स्फूर्ती गीत' हे भारतीय सैन्याच्या रेजिमेंट, मराठा लाईट इन्फंट्रीचे रेजिमेंटल गाणे तयार केले.

फडके यांना 'हा माझा मार्ग एकला', या मराठीतील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार (१९६३), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९९१) आणि सह्याद्री स्वररत्न पुरस्कार (२००२) यांसह अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. सुधीर फडके यांनी गोवा स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. ते अमेरिकेतील इंडिया हेरिटेज फाऊंडेशनचे संस्थापक सदस्यदेखील होते. अशा या ख्यातनाम संगीतकाराचे २९ जुलै २००२ रोजी मुंबईत निधन झाले.

(साभार : इंटरनेट)


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# पेरुमुळे रक्तातील साखर ठेवता येते नियंत्रित

फळे आपल्या शरीराला अत्यंत आवश्यक असे पोषण प्रदान करतात. परंतु तज्ज्ञांच्या मते, फळांच्या पानांमध्येही अनेक पोषक घटक असतात. पेरूच्या पानांमध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करणारे जास्त पोषक घटक असतात. दिल्लीतील सी. के. बिर्ला हॉस्पिटलमधील अंतर्गत औषध विभागाचे प्रमुख सल्लागार डॉ. नरंदर सिंगला यांनी पेरू, पेरूपासून तयार केलेली चाट आणि पेरूच्या पानांचे रक्तातील साखरेवर होणारे परिणाम याबाबतची माहिती दिली.



पेरूचा ग्लायसेमिक इंडेक्स तुलनेने कमी असतो, ज्यामुळे मधुमेह असलेल्या लोकांसाठी तो एक चांगला पर्याय आहे.परंतु, अर्ध्याहून अधिक पिकलेले पेरू जास्त प्रमाणात खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते, असे डॉ. सिंगला म्हणाले.

पेरू चाट : कमीत कमी साखर आणि मसाल्यांचा वापर करून बनवल्यास पेरू चाट हा एक आरोग्यदायी पर्याय ठरू शकतो. पेरूला जास्त मीठ, साखर किंवा मसाले लावून खाल्ल्याने त्याचे आरोग्यदायी फायदे कमी होऊ शकतात, असे डॉ. सिंगला म्हणाले.

**पेरूची पाने**

डॉ. सिंगला यांच्या मते, पेरूच्या पानांचा रक्तातील साखरेच्या पातळीवर सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. कारण– ते आतड्यांमध्ये शोषल्या जाणाऱ्या ग्लुकोजला रोखू शकतात आणि इन्सुलिन उत्पादनास उत्तेजन देऊ शकतात. तुम्ही पेरूच्या पानांचे सेवन चहा किंवा अर्काच्या स्वरूपात करू शकता.

**रक्तातील साखर कमी करते**

प्राणी आणि मानवी अभ्यासात पेरूची पाने रक्तातील साखरेची पातळी कमी करतात, असे आढळून आले आहे.

इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते : पेरूची पाने इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्यास मदत करू शकतात, ज्यामुळे टाईप २ मधुमेह होण्याचा धोका कमी होतो.अँटिऑक्सिडंट गुणधर्म : पेरूची पाने अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात, जे ऑक्सिडेटिव्ह ताण आणि जळजळ होण्यापासून संरक्षण करण्यास मदत करतात.सावधगिरी बाळगा

पेरूच्या सेवनामुळे तुमच्या रक्तशर्करेच्या पातळीवर प्रतिकूल परिणाम होत नाही ना याची खात्री करण्यासाठी तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियमितपणे तपासा.

# हरिहरेश्वरची सागरी सुरक्षा होणार बळकट!

## बंद पडलेली पोलीस चौकी नवसंजीवनीच्या वाटेवर



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील एक महत्त्वाचा किनारपट्टी भाग असलेल्या हरिहरेश्वरमध्ये गेल्या काही वर्षांपासून बंद असलेली पोलीस चौकी आता नवसंजीवनीकडे वाटचाल करत आहे. सागरी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील असलेल्या या परिसरातील पोलीस चौकी निसर्ग चक्रीवादळात उध्वस्त झाली होती. त्यानंतर ती नादुरुस्त अवस्थेतच होती आणि स्थानिक नागरिक वारंवार तिच्या दुरुस्तीची मागणी करत होते.

हरिहरेश्वर ग्रामपंचायतीने १९९६ मध्ये , मुंबईतील १९९३ मधील बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर, पोलीस चौकीसाठी जागा उपलब्ध करून दिली होती. प्रारंभी काही काळ चौकी कार्यरत होती, मात्र मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे ती बंद पडली. २०१८ साली ग्रामस्थांच्या मागणीनंतर ही चौकी पुन्हा कार्यान्वित झाली, परंतु २०२० मध्ये आलेल्या 'निसर्ग' चक्रीवादळात चौकीची इमारत पुन्हा मोठ्या प्रमाणात बाधित झाली.

हरिहरेश्वरचे माजी सरपंच अमित खोत, उपसरपंच सुयोग लांगी आणि स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेत आपल्या खिशातून खर्च करून चौकीची डागडुजी केली. काही काळ दोन पोलीस कर्मचारी चौकीत तैनातही होते. मात्र, पुन्हा एकदा मनुष्यबळ अभावामुळे ती बंद झाली.

सध्या रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी या चौकीच्या नुतनिकरणाच्या प्रक्रियेची तयारी दाखवली आहे. लवकरच काम सुरू होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. याअंतर्गत चौकीच्या इमारतीची नव्याने उभारणी, पोलीस तैनातीसाठी आवश्यक मनुष्यबळ पुरवणे यांचा समावेश असेल.

या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांनी नुकतीच हरिहरेश्वरमधील चौकीची पाहणी केली. त्यांच्या सोबत माजी नगराध्यक्ष फैसल हुर्जुक, माजी सरपंच अमित खोत, माजी उपसरपंच सुयोग लांगी तसेच स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी चौकी परिसराची साफसफाई ही करण्यात आली. ग्रामस्थांनी गरज भासल्यास आर्थिक मदतीचा हात पुढे करण्याचे आश्वासन दिले.

श्रीवर्धन तालुक्याला ५८ किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. पर्यटन, मासेमारी व सुरक्षा यासाठी हे क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे असून, सागरी सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी अशा चौक्या कार्यान्वित होणे काळाची गरज बनली आहे. हरिहरेश्वरमधील पोलीस चौकीचा पुनरुज्जीवन उपक्रम ही या दिशेने उचललेली महत्त्वाची पावले आहेत.त्यांच्या या विश्वासदायक आश्वासनामुळे ग्रामस्थांत समाधान आणि सुरक्षिततेची नवी आशा निर्माण झाली आहे.

> **हरिहरेश्वर पोलीस चौकीचे नूतनीकरण हे आमच्यासाठी प्राधान्याचा विषय आहे. चौकीचे पुनर्बांधणी व सुसज्जिकरण करण्यासाठी सीएसआर तसेच जिल्हा नियोजन निधीतून आवश्यक आर्थिक तरतूद मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. लवकरच ही चौकी आधुनिक स्वरूपात उभी राहील व गरजेनुसार मनुष्यबळाचीही नियुक्ती केली जाईल.**
>
> **–सविता गर्जे**
> **उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीवर्धन**

# गणेशमूर्ती ३० टक्क्यांनी महागल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशमूर्तीचे माहेरघर अशी ओळख असलेल्या पेण शहरात सध्या गणेश मूर्ती तयार करण्याची लगबग सुरू आहे. गणेशोत्सवाला जेमतेम महिना उरला असताना कारागीरांची घाई गडबड सुरू आहे. पीओपीच्या मूर्तींवरील बंदी उठल्याने मूर्तीकार खुश असले तरी यंदा गणेशमूर्तींच्या वाढत्या किंमतीची झळ गणेशभक्तांना बसणार आहे. यंदा गणेशमूर्तींच्या किंमती ३० ते ३५ टक्क्यांनी महागणार असल्याचे मूर्तीकार सांगताहेत.



सध्या गणेशमूर्तींवर रंगाचा अखेरचा हात मारून मूर्ती रवाना करण्याचे करण्याच्या कामाला आता वेग आलाय. कारागीर रात्रंदिवस काम करीत आहेत. सुबक रेखीव काम आणि आकर्षक रंगसंगती यामुळे पेणच्या गणेशमूर्तींना जगभरातून मागणी असते. केवळ पेण शहरच नव्हे तर आजूबाजूच्या गावांमध्येदेखील दरवर्षी इथल्या लाखो मूर्ती तयार केल्या जातात. परंतु यंदा पीओपीवरील बंदीमुळे मुर्तीकारांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. बहुतांश कार्यशाळांमध्ये काम ठप्प होते. तिथं काम सुरू होते ते मंदगतीने सुरू होते. कारागीरांनाही काम नव्हते यंदा गणेशमूर्ती शाडूमातीच्या बनवायच्या की पीओपीच्या याबाबतचा संभ्रम जूनच्या पहिल्या आठवडयापर्यंत कायम होता.

अनेकांनी बँकांकडून कर्ज उचलून कच्चा माल आणला होता. कारागीरांना आगावू रक्कम देखील दिली होती. कर्जाचा डोंगर उभा राहिला होता. पेण तालुक्यातील गणेश कार्यशाळांमध्ये निराशेचे वातावरण होते. अशा स्थितीत करायचं काय अशा विवंचनेत सारे असतानाच अखेर मूर्तीकारांच्या लढयाला यश आलं. ९ जून रोजी पीओपी वरील बंदी उठल्यानंतर कामाला वेग आला. परंतु आता गणेशोत्सवाला अवघा सव्वा महिना उरला आहे. इतक्या कमी दिवसात मूर्ती बनवायच्या, वाळवायच्या ही कामे पूर्ण होणार नाहीत. बंदी उठल्यानंतर व्यावसायिकांनी मोठया प्रमाणात ऑर्डर्स द्यायला सुरूवात केली परंतु आता वेळेअभावी मागणी इतका पुरवठा करू शकत नाही, असं मूर्तीकार सांगतात.

हे सर्व असताना वीजेच्या लपंडावाने मुर्तीकार हैराण झाले आहेत. पेण शहर आणि परीसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असतो. वीज गेली तर मुर्तीचे रंगकाम करण्यात अडथळा येतो. मूर्ती सुकवण्यासाठी पंखे, हीटरचा वापर करावा लागतो. वीज ल्यावर हीटर पंखे वापरता येत नाही मग त्याचा कामावर परीणाम होतो. या सर्व परीस्थितीत यंदा गणेश मुर्तीच्या किंमती ३० ते ३५ टक्क्यांनी महागल्याचे मूर्तीकार सांगतात.

> **माघी गणेशोत्सवापासूनच पीओपीवरील बंदीचा मुद्दा चर्चेत आला तेव्हापासूनच मूर्तीकारांमध्ये निराशा पसरली होती. आता बंदी उठली असली तरी एवढया कमी वेळात जेवढी मागणी आहे त्या प्रमाणात आम्ही पुरवठा करू शकत नाही. त्यातच खंडीत वीजपुरवठा त्रासदायक ठरतो आहे. या परीस्थितीत मूर्तींच्या किंमती ३० ते ३५ टक्क्यांनी वाढवण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.**
>
> **–निलेश समेळ, मूर्तीकार**

## चोरट्यांनी डिकसळमधून डंपर चोरला

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात दिवसेंदिवस चोरीच्या घटना वाढत असताना चक्क डंपर चोरीला गेल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.नेरळ पोलिस ठाणे हद्दीत येत असलेल्या डिकसळ येथून दहा ब्रासचा डंपर चोरीला गेला आहे.शैलेश भासे यांच्या मालकीचा हा डंपर असून त्यांनी याबाबत नेरळ पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात तक्रार दाखल केली आहे.

कर्जत कल्याण राज्य मार्गाला लागून असणाऱ्या नेरळ पोलिस ठाणे हद्दीतील डिकसळ गावात राहणारे भासे यांनी आपला डंपर हा फ्लोरेन्स टॉवर या सोसायटीच्या मोकळ्या जागेत पार्क केला होता.एमएच ४६ /बीएफ ७२०० हा दहा टायर असलेला डंपर साडेचार लाख रुपये किमतीचा असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.डंपर रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्यांनी आधाराचा फायदा घेत चोरून नेला आहे याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक तपास पोलीस संदीप फड हे करीत आहेत.


## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल तालुका यांचे समोर

**सहाय्यक निबंधक पनवेल, ता. पनवेल/कलम १०१/ सुनावणी नोटीस /२०२५**

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पनवेल यांचे कार्यालय, पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार मार्ग, रायगड बाजाराच्या बाजूला पनवेल जि.रायगड ४१०२०६**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल ता. पनवेल जि. रायगड या संस्थेने खालील प्रतिवादी विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये थकबाकी वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज या कार्यालयाकडे दाखल केले असून त्यासंबंधी वेळोवेळी सुनावणी घेण्यात आली. तथापी खालील नमूद प्रतिवादी यांना वादीने उपलब्ध करून दिलेल्या पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने नोटीस देऊन देखील नोटीस बजावणी झालेली नाही. त्यामुळे खालील नमुद प्रतिवादी यांना या जाहीर नोटीशीद्वारे त्यांचे म्हणणे मांडणेसाठी एक संधी देण्यात येत असून कळविण्यात येते की, सदर प्रकरणी अंतिम सुनावणी सोमवार दि. ०४/०८/२०२५ रोजी सकाळी ठिक ११. ३० वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पनवेल, पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार मार्ग, रायगड बाजाराच्या बाजूला पनवेल जि. रायगड या कार्यालयात आयोजित केलेली आहे. सदर दिवशी आपले म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वतः किंवा आपल्या वैध प्रतिनिधींमार्फत हजर रहावे या कामी आपण गैरहजर राहिल्यास आपणास या बाबत काहीही म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहित धरून आपल्या अनुपस्थीत वादी संस्थेने दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

| दावा क्रमांक | प्रतिवादी नाव व पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|
| २७३/२०२५ | १) श्री. निलेश सुरेश चोणकर रा. फ्लॅट नं. ६०४/७०४, राधा हरि निवास, टिळक रोड, कमळ महिला पतपेढीच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६<br>२) श्री. परेश सुरेश चोणकर रा. फ्लॅट नं. ६०४/७०४, राधा हरि निवास, टिळक रोड, कमळ महिला पतपेढीच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड, ४१० २०६<br>३) श्री. किरण वासूदेव जेठनानी रा. राधा हरि निवास, फ्लॅट नं. अे-१०२, पहिला मजला, टिळक रोड, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६ | २०,१४,४६९/- |
| २७५/२०२५ | १) श्री. प्रतिक वसंत वाजेकर रा. घर क. ३८ अे-१, मिरची गल्ली, कुंभार वाडा, संत गोरा कुंभार मंदिराजवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६<br>२) श्री. संदिप मधुकर पाटील रा. रूम नं. ११४५ अे, मिरची गल्ली, वैश्य समाज हॉल जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१० २०६ | ५०,२६७/- |
| २७४/२०२५ | १) श्री. बाळु बन्सी केदार रा. सुयश को.ऑप.हौ. सोसायटी, फ्लॅट नं. ०४, बी/६, सेक्टर-७, खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड, ४१० २०६<br>२) श्री. नाथा बाळाराम घरत रा. कोन, घरत आळी, मेडिकल जवळ, पो. आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २०६<br>३) श्री. धीरज साहेबराव तांदळे रा. कोन, म्हात्रे आळी, ओल्ड मुंबई पुणे हायवे, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४५०२०६ | २,३०,४९८/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्यानिशी दिली असे.
स्थळ- पनवेल
दिनांक २१/०७/२०२५

शिक्का

**सही/-**
**(भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, पनवेल, जि. रायगड**

**जा.क्र. १९९६/२०२५**


# अंध:कारातून जीवनातील प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग म्हणजे दीप अमावस्या -हभप योगेशमहाराज पारठे

**चौक : प्रतिनिधी**

आषाढ वद्य अमावस्या म्हणजे दीप अमावस्या. श्रावण मास चालु होण्याच्या अगोदरच्या दिवशी येते ती अमावस्या म्हणजे दीप अमावस्या. दिव्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. अज्ञानरुपी अंधःकारातुन ज्ञानरुपी प्रकाशाकडे जाणे.जे दीप संपूर्ण वर्षभर आपल्याला प्रकाश देतात किंवा आपल्याला प्रकाशाची स्वच्छ वाट दाखवतात त्यांच्या सेवेचा आजचा दिवस म्हणजे दीप अमावस्या, असे प्रतिपादन ज्येष्ठ प्रवचनकार योगेश महाराज पारठे यांनी केले.



वावंढळवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते रामदास काईनकर व त्यांच्या परिवाराने ज्येष्ठ कीर्तनकार,समाजप्रबोधनकर हभप संदीप महाराज यादव यांच्या मार्गदर्शनाखाली दीप अमावस्या मोठ्या उत्साहात साजरी केली.यावेळी हभप. योगेश महाराज पारठे व हभप दामोदर महाराज पालांडे यांच्या प्रवचनाबरोबर दीप उत्सव,आरती,भजन व महाप्रसाद असा दिवसभर कार्यक्रम साजरा करण्यात आला.

दीप अमावस्येचे विशेष महत्त्व आषाढ अमावस्या जी दीप अमावस्या म्हणून साजरी केली जाते. महाराष्ट्र राज्यात मोठ्या उत्साहाने पाळली जाते. पण काही धर्मद्रोही लोकांनी तिची व्याख्या बदलून हिंदू संस्कृतीला कलंक लावण्याचे काम केले असे हभप दामोदर महाराज पालांडे यांनी सांगितले.या दिवशी घरातील सर्व पणती, समई आणि निरांजन स्वच्छ करून त्यांची पूजा केली जाते. ही प्रथा पावसाळ्यातील गडद अंधार आणि मनातील नकारात्मकता दूर करून श्रावण महिन्याचे स्वागत करण्यासाठी केली जाते. असे जेष्ठ कीर्तनकार संदीप महाराज यादव यांनी सांगितले.

# मुरुडमध्ये बजरंग दलाच्या अभ्यासवर्गाला प्रतिसाद



**मुरुड : प्रतिनिधी**

विहिंप रायगड जिल्हा मुरुड प्रखंड कोकण प्रांत बजरंग दल अभ्यास वर्गाचे दोन दिवसीय आयोजन मुरुड येथील हिंदू एज्युकेशन सोसायटी मध्ये बजरंग दल विभाग मंत्री ॲड. अनिकेत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले .

या उदघाटन प्रसंगी बजरंग दल जिल्हा मंत्री जितेंद्र करंजकर , जिल्हा उपाध्यक्ष संतोष भोईर , जिल्हा संयोजक किरण काकडे , हिंदू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिलीप जोशी, ग.रा पाटील , सुनिल विरकुड , प्रा.अनुप सिंह आदी मान्यवर उपस्थित होते .सुरक्षा , संस्कार सेवा आणि संस्कृती या विषयावर ड. अनिकेत ठाकूर यांनी शिबीरार्थींना मागदर्शन केले .

अभ्यास वर्गात मुक्त चिंतन , संस्कार क्षम कार्यकर्ता आदींवर मुक्त चर्चा करण्यात आली तसेच मैदानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. समारोप प्रसंगी दिलीप जोशी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांचा कार्याचा आढावा घेत लाखो समर्पित कार्यकर्त्यांच्या योगदानामुळे हे शक्य झाल्याचे सांगुन हिंदू समाज संघटितपणे उभा राहण्यासाठी संघाचे हे ईश्वरी कार्य निष्ठेने आणि जिद्दीने पुढे नेण्याचे आव्हान स्विकारावे असे आवाहन केले. या अभ्यासवर्गात तालुक्यातील ५७ बजरंगींनी उपस्थिती होती.

# पाली-खोपोली राज्य महामार्गावर दोन कारचा अपघात; चालक जखमी

**पाली : प्रतिनिधी**

पाली-खोपोली राज्य महामार्गावर तिवरे गावच्या हद्दीत दोन कार एकमेकांना धडकून बुधवारी उशिरा भीषण अपघात झाला. या अपघातात एका कार मधील चालक गंभीररीत्या जखमी झाला असून दोन्हीही कारचे प्रचंड नुकसान झाले आहे. यातील एका कारमध्ये मद्याच्या बाटल्या आढळून आल्या आहेत. त्यामुळे यातील प्रवासी गटारी साजरी करण्यासाठी जात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तिवरे गावच्या हद्दीतील वळणावर होंडा कार व मारुती सेलेरिओ कार या दोन कारचा एकमेकांना धडकून भीषण अपघात झाला. या अपघातात सेलेरिओ कारचा चालक गंभीररीत्या जखमी झाला इतरांना किरकोळ दुखापत झाली. दोन्हीही वाहनांचे या अपघातात मोठे नुकसान झाले आहे. गाडीतील हे तरुण गटारी साजरी करण्यासाठी निघाले होते असा अंदाज करण्यात येत आहे.






# पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

## शुध्दीपत्रक

आहेत. दि. २२/०७/२०२५ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. परंतु सदर सुचनेतील रक्कमेमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. (GST सह) | निविदा अनामत रक्कम (रु) | | कोरी निविदा किंमत रु. (GST सह) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुळ सुचनेतील नमुद केलेली रक्कम | सुधारीत रक्कम रु. | मुळ सुचनेतील नमुद केलेली रक्कम | सुधारीत रक्कम रु. |
| १. | पनवेल महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत पनवेल महानगरपालिका हद्दीतील झाडे तोडणी/ पुनर्रोपण व फांद्या छाटणी परवानगीसाठी ऑनलाईन अर्ज प्रणाली विकसित करणे. | ९,९०,०००/- | २,०००/- | ९,९००/- | ५००/- | ५९०/- |

१. या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दि. २२/०७/२०२५ पासून दि. २८/०७/२०२५ पर्यत सायं ३.०० वाजेपर्यत (कार्यालयीन वेळेत) पनवेल महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण विभागात उपलब्ध होतील.
२. अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत, लखोटा क्रं.१ मध्ये सादर करण्याचा आहे.
३. सीलबंद निविदा दिनांक. २८/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागात स्विकारण्यात येतील.
४. प्राप्त झालेल्या निविदा शक्य असेल तर दि. २९/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० नंतर उपायुक्त वृक्ष प्राधिकरण विभाग यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
५. प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

**सही /-**
**उपायुक्त (वृक्ष प्राधिकरण)**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ३४९/२०२५**
**दिनांक :- २४/०७/२०२५**

## निवडक



### तब्बल ५० वेळा प्लाझ्मादान

**नवी मुंबई :** नेरूळ गावातील रवी मढवी या युवकाने तब्बल ५० वेळा प्लाझ्मादान करत अनेकांना जीवदान देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या प्लाझ्मादानातून अनेक रुग्णांना दिलासा मिळाला आहे. मढवी हे सातत्याने समाजसेवा करत असतात. त्यासह त्यांनी प्लाझ्मा दान करण्याचा वसाच घेतला अंकाचे त्यांच्या कृतीतून दोन येत आहे. टाटा कॅन्सर हॉस्पिटल खारघर येथील कर्करोग रुग्णांसाठी रवी यांनी आतापर्यंत तब्बल ५० वेळा प्लाझ्मादान केले आहे. टाटा रुग्णालयातून प्लाझ्मा गरजेसाठी ज्यावेळी त्यांना कॉल आलेले आहेत त्यावेळी तातडीने रवी हे प्लाझ्मा दान करण्यासाठी पोहचतात. त्यांच्या या निश्चयाचे कौतुक होत आहे.

### चारसूत्री पद्धतीने भात लागवड

**उरण :** तालुक्यातील चाणजे, येथे सोमवारी (दि. २१) उरण तालुका कृषी विभागाकडून भरती उमेश म्हात्रे यांच्या शेतावर कृषी अधिकारी उरण अर्चना सुळ नारनवर,यांनी शेतात उतरून आत्मा अंतर्गत रत्नागिरी आठ या वाणाचे चारसूत्री पद्धतीने भात लागवड केली. उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांना चारसूत्री भात लागवड पद्धतीमुळे लागणारा खर्च बचत, उत्पादन वाढ तसेच चारसूत्री भात लागवडीच्या प्रत्येक सूत्रांबद्दल मार्गदर्शन केले. या वेळी सहाय्यक कृषी अधिकारी गटकळ, बुरकुल मॅडम, उप कृषी अधिकारी, श्रीम.अदीका पानसरे, नमिता वाकळे, बी.टी.एम आदी उपस्थित होते.

### सेवानिवृत्त शिक्षकांचा निरोप समारंभ

**उरण :** तालुक्यातील सन २०२४२५ या वर्षांमध्ये सेवानिवृत्त



झालेल्या शिक्षक बंधू भगिनींसाठी पंचायत समिती शिक्षण विभागसोमवार (दि.२१) यांनी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला गट विकास अधिकारी सर्जे राव पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सर्व सेवानिवृत्त शिक्षक बंधू भगिनींचा सत्कार समारंभ करण्यात आला एकूण अठराषशिक्षकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत, पंचायत समिती उरण कक्ष अधिकारी धाटावकर, पाच केंद्राचे केंद्रप्रमुख, शंकर म्हात्रे, बबन पाटील, दर्शन पाटील, दिलीप पाटील, प्रवीण पाटील आदी उपस्थित होते.

### भूमिका परमार अध्यक्षपदी



**पनवेल :** इनरव्हील क्लब ऑफ गॅलेक्सी न्यू पनवेलच्या अध्यक्षपदी भूमिका परमार यांची २०२५-२०२६सालासाठी निवड झाली असून, नुकताच पदग्रहण समारंभ तथास्तू हॉल येथे झाला. क्लबच्या सेक्रेटरीपदी दिपाली आडमुठे, व्हाईस प्रेसिडेंट उल्का धुरी, आयपीपी कल्पना कोठारी, खजिनदार अर्चना राजे, आयएसओ सुनिता गुर्जर, एडिटर राजश्री नाईक, सिपीसी शितल वंळजू, जॉईट सेक्रेटरी अंजना गांधी, तर सल्लागार समितीमध्ये सुनिता आडमुठे, साधना धारगळकर, स्नेहल वाडकर, विद्या चव्हाण, ममता राजीवन, छाया ठक्कर, दर्शना निकम यांची निवड करण्यात आली. मावळत्या अध्यक्षा कल्पना कोठारी यांनी वर्षभर केलेल्या सहकार्याबद्दल सदस्याचे आभार मानले.

# खारघरमध्ये तीन हजार वाहनचालकांवर कारवाई

## लाखोंचा दंड वसूल

**पनवेल : वार्ताहर**

वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर खारघर वाहतूक शाखेने कारवाईचा बडगा उगारला आहे. १ ते २० जुलै या अवघ्या २० दिवसांत तीन हजार बेशिस्त वाहनचालकांकडून हजारोंचा दंड वसूल केला आहे, तर गेल्या १० महिन्यांत १० लाखांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



खारघर लोकसंख्येबरोबरच शहरात वाहनांची संख्याही वाढली आहे. वाहतुकीला शिस्त लागण्यासाठी तसेच अपघात रोखण्यासाठी खारघर वाहतूक शाखेने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. यात १ जानेवारी ते २५ एप्रिलदरम्यान राबवण्यात आलेल्या मोहिमेत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १२ हजार वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करून १० लाख ४८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला होते.

गेल्या २० दिवसांत वाहन चालविताना मोबाईल फोनवर बोलणे, सिग्नल तोडणे, दुचाकीवरून तिघांनी प्रवास करणे, विनाहेल्मेट, सुरक्षा बेल्ट परिधान न करणे तसेच मुख्य रस्ते, चौकात वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणे अशा तीन हजार बेशिस्त चालकांवर कारवाई करत हजारो रुपयांचा दंड वसूल केला आहे. दंडवसुली करताना कोंडी सोडवण्याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**रिक्षाचालकांच्या मनमानीला लगाम**

खारघर रेल्वेस्थानकावर बेशिस्तपणे रिक्षा उभी करून प्रवाशांना अडथळा निर्माण करणे, त्यांच्याशी वाद घालणे आदी प्रकाराला आळा घालण्यासाठी खारघर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. त्यामुळे रिक्षाचालकांच्या मनमानीला लगाम बसला आहे.

**वाढत्या लोकसंख्येत वाहनांचीही भर पडत आहे. चालकांनी नियमांचे पालन करून सहकार्य करावे.**

–तिरुपती काकडे,
उपायुक्त, वाहतूक विभाग

## शाळा, महाविद्यालयात सायबर सेलसंदर्भात मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हद्दीतील विविध शाळा व महाविद्यालयात सायबर सेल संदर्भात मार्गदर्शन केले.

या वेळी सायबर सेलच्या माध्यमातून कोणालाही ओटीपी नंबर देऊ नये, अनोळखी लिंक ओपन करू नयेत, सोशल मीडियाचा कमीत कमी वापर करावा, कुठल्याही आमिषाला बळी पडू नये, अनोळखी व्यक्तींना तसेच अकाउंटला सोशल मीडियावर फॉलो करू नये, अनोळखी फोन तसेच व्यक्तींना आपली वैयक्तिक माहिती, आधार कार्ड, पॅनकार्ड देऊ नये असे मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थिनींना गुड टच, बॅड टचसंदर्भात माहिती देण्यात आली.

रहिवासी सोसायट्यांमध्ये भाडेकरू ठेवताना त्याची पूर्ण माहिती पोलीस ठाण्याकडे व सोसायटी कडे असलीच पाहिजे, सोसायटीच्या चारही बाजूला सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावेत, सुरक्षारक्षक नेमल्यास त्याची माहितीसुद्धा संबंधित सोसायटी पदाधिकाऱ्यांकडे असली पाहिजे.



**उरण : आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक निखिल माळी यांना वाढदिवसानिमित्त माजी नगरसेवक कौशिक शाह, भाजप ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, तालुका संपर्कप्रमुख करण ठाकूर, पाले गाव अध्यक्ष अमित म्हात्रे, कुंदन गायकवाड, पुनाडे ग्रामपंचायत सदस्य रसिक पाटील, वशेणी युवा नेते मुकेश म्हात्रे, वशेणी ग्रामपंचायत सदस्य संग्राम पाटील, उद्योजक देवेंद्र पाटील आदींनी अभिनंदन केले.**

## नरेंद्राचार्य महाराजांचे स्वागत आणि दर्शन



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांचे समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा १९ व २० जुलै २०२५ सकाळी तेरापंथ भवन, कांदिवली पूर्व, मुंबई येथे झाला. या वेळी भक्तगणांनी मोठया उत्साहाने स्वागत केले.

रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेने संस्थानच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात, यात शैक्षणिक उपक्रम संगणक वाटप, जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज एज्युकेशनल इन्स्टिट्युट मध्ये विनामूल्य शिक्षण दिले जाते.

रामानंदाचार्य नरेंद्राचार्य दर्शनासाठी माजी खासदार पियुष गोयल (केंद्रीय मंत्री-भाजपा केंद्रीय वाणिज्य मंत्री), मा. आमदार मंगलप्रभात लोढा, गृहराज्यमंत्री, योगेश कदम, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार संजय उपाध्याय, आमदार मनीषा चौधरी, आमदार अतुल भातखळकर (भाजप कांदिवली विधानसभा), आमदार दिलीप लांडे, आमदार विद्या ठाकूर, आमदार अनंत (बाळा) नर, मा. खासदार गजानन कीर्तिकर (शिवसेना), शिवसेना उपनेते अमोल कीर्तीकर, गोपाळ शेट्टी, (माजी खासदार भा.ज.पा.), रामदास कदम (शिवसेना उपनेते), दिलीप जगताप (अध्यक्ष अखिल भारतीय मराठा महासंघ), अशोक पाटील राजूकर (भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष) तसेच अनेक मान्यवरांनी कार्यक्रमाला हजेरी लावली.

## उरणमधील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश

**उरण : बातमीदार**

राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उरण तालुक्यातील २२ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत इयत्ता ५ वी साठी शिष्यवृत्ती पात्रता मिळविली आहे.यामध्ये अन्वय अमित म्हात्रे, साची निलेश घरत, आस्था सुभाष जैन, ऋतुराज मानसिंग शिंदे, आलिशा जयकुमार म्हात्रे, आरोही विवेक कांबळे, शिवांश नितेश नाखवा, पियुष धिरेंद्र शेडगे, विधी दिनेश जानवळकर, तन्मय संदेश गोरेगावकर, अर्णव संतोश शिंदे, स्वरूप सनमाने पाटील,

जयंत विजय देवरे, विश्वजीत जितेंद्र कोंडवाले, दक्ष जगदीश पाटील, काव्या विश्वास पाटील, ओवी संदीप सुतार, अधरव्यु वैभव भगत, क्षितिज मनिष घरत,काव्या मयूर गावंड,प्रचित दिपक अगास्कर, स्वराज घनश्याम पाटील यांचा समावेश आहे. राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उरण तालुक्यातील २२ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत इयत्ता पाचवीसाठी शिष्यवृत्ती पात्रता मिळविली आहे. त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांवर सर्वच स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## जाळ्यात अडकलेल्या अजगराला दिले जीवदान



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सर्पमित्र अष्टविनायक मोरे व त्यांचे सहकारी भरत पुजारी यांनीबिन - विषारी जातीचा आठ ते दहा फुट लांबीच्या अजगराची जाळ्यातुन सुटका करुन सुरक्षित रित्या जवळच असलेल्या जंगलात सोडून दिले

सी.बी.डी बेलापूर सेक्टर- ८ येथे असलेल्या दुर्गा माता नगर येथे २० जुलै रोजी संध्याकाळी ५:३०च्या सुमारास पुनर्वसु फॉउंडेशन संस्थेला एक भला मोठा सर्प असल्याची माहिती तेथील नागरिकांनी फोन वरून दिली. या वेळी त्वरित घटनेची माहिती संस्थेचे सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांना देण्यात आली. अष्टविनायक आपले सहकारी सर्प मित्र भरत पुजारी यांना घेऊन घटनास्थळी पोहचले तिथे जाऊन पाहणी केल्यावर लक्षात आले, की जाळ्यामध्ये बिन - विषारी जातीचा आठ ते दहा फुट लांबीचा अजगर जाळीमध्ये अडकला आहे.

त्यामुळे त्याला बऱ्याच तासापासून जाळ्यातून बाहेर येता येत नव्हते. क्षणाचाही विलंभ न करता बचाव कार्यास सुरुवात झाली त्या जाळीला थोडंसं तोडून सर्पमित्र यांनी अजगराला कोणतीही दुःखापत न होता सुखरूप रित्या बाहेर काढले तेथील सर्व नागरिकांनी सर्पमित्रांने केलेल्या अथक परिश्रमाचे कौतुक दोघांचे आभार मानले. त्यानंतर अजगर जातीच्या सापाची पाहणी करून त्यास कोणतीही इजा झाली नाही ना याची खात्री करून,सदर अजगरची माहिती वनविभागास कळवून त्यास सुरक्षितरित्या जवळच असलेल्या जंगलात सोडून देण्यात आले.

# नागरिकांच्या सुरक्षेसाठी बैठक

## चोरट्यांच्या हालचालींबाबत पोलिसांनी केले सतर्क

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे सेक्टर ६मध्ये गेल्या काही दिवसांत रात्रीच्या वेळी घरफोडीच्या घटना घडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. काही इमारतींमध्ये मध्यरात्री संशयित चोरटे शिरकाव करत असल्याच्या घटना सीसीटीव्ही फुटेजमधून समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सेक्टर ६ येथील प्लॉट नंबर ९१, नेक्सस व्ह्यू सोसायटी येथे पनवेल शहर पोलीस आणि करंजाडे ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने एक बैठक घेण्यात आली होती. बैठकीला परिसरातील सर्व सोसायट्यांचे अध्यक्ष, सचिव तसेच इतर पदाधिकारी व वॉचमन एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित होते.



या बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना करंजाडे पोलीस चौकीचे स.पो.नि. बजरंग राजपूत व करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांनी मार्गदर्शन करत उपस्थितांना विविध प्रकारच्या महत्त्वपूर्ण सूचना केल्या. दरम्यान, त्यांनी भाडेकरू ठेवताना भाडेकरार आणि पोलीस एनओसी घेणे अनिवार्य आहे. तसे न केल्यास काही अनुचित घटना घडल्यास त्या घटनेला घरमालकास जबाबदार धरले जाईल,असे सांगितले. डिलिव्हरी बॉय, सेल्समन यांसारख्या व्यक्तींना थेट इमारतीमध्ये प्रवेश देऊ नये, त्यांच्या ऑर्डर अथवा कामासाठी संबंधित व्यक्तींनी स्वतः इमारती खाली येऊन आपले पार्सल घेऊन जावे. आपल्या इमारतीत सीसीटीव्ही कॅमेरे लावावे, असे आवाहन या वेळी नागरिकांना करण्यात आले.

या वेळी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे व.पो.नि. नितीन ठाकरे यांनी एका पत्राद्वारे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करत 'आजूबाजूला कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास नागरिकांनी ११२ क्रमांकावर डायल करून तातडीने पोलिसांना कळवावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने सोसायटीचे प्रवेशद्वार, मुख्य रस्ता, पार्किंग, लिफ्ट, गार्डन परिसर व बाह्य परिसरात उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशा महत्त्वाच्या सूचना व.पो.नि. नितीन ठाकरे यांनी या बैठकीच्या माध्यमातून नागरिकांना केल्या.

दरम्यान, या बैठकीत करंजाडे परिसरात चोरी व घरफोडीच्या घटनांना आळा घालण्यासाठी नागरिकांना सतर्क राहून येथील सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा बार्न्स स्कूलमध्ये वर्ग अंतर्गत फेरीला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, संवादकौशल्य विकसित करणे आणि नेतृत्वगुणांना चालना देणे या उद्देशाने कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेची वर्ग अंतर्गत फेरी के एस ए बार्न्स स्कूल पनवेल येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेविका दर्शना भोईर, कोमल कोळी, कोशिश फाऊंडेशनचे स्वयंसेवक, शिक्षक उपस्थित होते.



या शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी माझं कुटुंब, माझं स्वप्न, माझा पहिला शाळेचा दिवस, शिक्षणाचं महत्त्व, स्वच्छ भारत, प्लास्टिक मुक्त भारत अशा विषयांवर आपले विचार प्रभावी पद्धतीने मांडले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आत्मविश्वासाने भाषणं सादर करत उपस्थितांचे मन जिंकले. अनेक मुलांनी पहिल्यांदाच व्यासपीठावर उभं राहून बोलण्याचा अनुभव घेतला, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. या उपक्रमाचे आयोजन कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

मुख्याध्यापक योगिता चौधरी यांनी सांगितले, विद्यार्थ्यांनी या स्पर्धेतून उत्कृष्ट आत्मविश्वास दाखवला. पुढील फेरीसाठी विद्यार्थ्यांनी अजून चांगली तयारी करतील, ही खात्री आहे. या वर्ग अंतर्गत फेरीतील विजेत्या विद्यार्थ्यांची पुढील शाळा अंतर्गत फेरीसाठी निवड करण्यात येणार आहे. पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही स्पर्धा यशस्वी झाली. इयत्ता नववी मधील विद्यार्थी अभ्रम अधिकारी म्हणाला की, कोशिश फाउंडेशन आणि परेश ठाकूर सरांनी आम्हाला सुंदर असा मंच दिला, याबद्दल मी मनःपूर्वक धन्यवाद देतो. या स्पर्धेमुळे मला सर्वांसमोर न घाबरता बोलण्याची संधी मिळाली आणि आता मला पुढच्या फेरीसाठी अजून चांगली तयारी करायची आहे.

**कोशिश फाउंडेशन आणि परेश ठाकूर सरांनी आम्हाला सुंदर असा मंच दिला, याबद्दल मी मन:पूर्वक धन्यवाद देतो. या स्पर्धेमुळे मला सर्वांसमोर न घाबरता बोलण्याची संधी मिळाली आणि आता मला पुढच्या फेरीसाठी अजून चांगली तयारी करायची आहे.**

**–अभ्रम अधिकारी,**
**विद्यार्थी, इयत्ता नववी**

# माणगावमधील नाट्यगृहाचे काम अपूर्णच

## ◆ वाढीव निधीची गरज ◆ आसनक्षमताही वाढवण्याची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

नाट्यगृह मंजूर होऊन तब्बल आठ वर्षे झाली तरी हे नाट्यगृहाचे काम अपूर्णच आहे. कधी पूर्ण होणार असा सवाल नाट्यप्रेमी रसिकातून बोलताना व्यक्त होत आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव हे ठिकाण मध्यवर्ती असून ते झपाट्याने विकसित होत आहे. शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्राबरोबरच सांस्कृतिक जडणघडणीचे केंद्र म्हणून पहिले जाते. या भागातील सांस्कृतिक चळवळीला अधिक वाव मिळावा यासाठी आठ वर्षांपूर्वी माणगाव येथे नाट्यगृह मंजूर झाले होते, मात्र अपुरा निधी मिळत असल्याने हे नाट्यगृह आठ वर्षानंतरही अपूर्णच राहिले.



या नाट्यगृहासाठी जो निधी मंजूर झाला होता. त्याला आठ वर्ष लोटले. आता याच साहित्याचे दर आवाक्याबाहेर गेल्याने आठ वर्षांपूर्वी मंजूर झालेल्या निधीत हे नाट्यगृहाचे काम कसे होणार हा प्रश्नच सर्वांसमोर उभा आहे. या निधीत आताचे दर विचारात घेऊन पुनर्मूल्यांकन करून निधी मंजूर करावा अशी मागणी होत आहे. अपुऱ्या निधीमुळे नाट्यगृहाच्या बांधकामाला गती मिळत नसल्याची चर्चा रसिक प्रेक्षकातून होत आहे.

सध्या या नाट्यगृहाचे काम ५० टक्के झाले आहे. बाल्कनीचे काम अंतिम टप्यात आले आहे. दक्षिण रायगडमधील सांस्कृतिक क्षेत्राला उत्तेजन मिळावे तसेच येथे नवनवीन व व्यावसायिक नाटक प्रेक्षकांना पाहता यावीत यासाठी या भागातील नाट्यप्रेमींच्या मागणीचा विचार करून माणगाव नगरपंचायत हद्दीत शासकीय विश्रामगृहासमोर नाट्यगृह मंजूर झाले. त्याला तब्बल आठ वर्ष लोटली, या नाट्यगृहाचे बांधकाम अपूर्ण असल्याने नाट्यगृहावरच प्रश्नचिन्ह उभारले आहे. नाट्यगृहाच्या बांधकामाला पुरेसा व वेळेत निधी मिळाला नसल्याने या बांधकामा बाबत नागरिकांतून सवाल उपस्थित होत आहे.

माणगाव नगरपंचायत हद्दीमध्ये नाट्यगृह बांधकाम करणेसाठी महाराष्ट्र शासनाचे संस्कृतीक कार्य विभागाकडून नाट्यगृह मंजूर झाले होते. त्यानंतर आता बराच कालावधी गेल्याने सर्वच बांधकाम साहित्याचे दर कित्येक पटीने वाढले आहेत. तसेच मजुरीही मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे नाट्यगृह बांधकामाला हा निधी अपुरा पडत आहे. त्यामुळे नाट्यगृहाच्या बांधकामाचा तिढा कायम राहणार आहे. यासाठी शासनाकडून पुरेसा निधी मंजूर करून माणगावचे देखणे सर्व सोयीनीयुक्त प्रशस्त नाट्यगृह उभारू शकतील अशी आशा नागरिकांना वाटत आहे. या नाट्यगृहात प्रेक्षकांची बसण्याची क्षमता वाढविल्यास खऱ्या अर्थाने हे नाट्यगृह दक्षिण रायगडमध्ये नावारूपाला येईल. अशी आशा नागरिकांना वाटत आहे.

सध्या पनवेल, रोहा, महाड येथे नाट्यगृह आहेत. तर रत्नागिरी जिल्ह्यात खेड, चिपळूण, येथे नाट्यगृह आहेत. माणगावचे नाट्यगृह ५०० बैठक आसन क्षमतेचे असल्याने तिकिटाचा दर आयोजकांना पर्यायानी वाढवावा लागणार असून हा खर्च उभा करण्यासाठी रसिकांच्या खिशाला कात्री लागणार आहे. या नाट्यगृहाची आसन क्षमता वाढवून ७०० किंवा १००० केल्यास या नाट्यगृहात लहान-मोठे कार्यक्रम व दर्जेदार नाटक ठेवणे सोयीस्कर होईल.

## रोह्यातील नवीन नाट्यगृहाचे काम प्रगतिपथावर

### अनिकेत तटकरे यांनी केली पाहणी

**रोहे : प्रतिनिधी**

नाट्यरसिकांना उत्सुकता असलेल्या रोहा शहरात नव्याने बांधण्यात येत असलेल्या नाट्यगृहाची पाहणी माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी केली.

खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या पुढाकाराने रोहा शहरात रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या नाट्यगृह लवकरात पुर्ण होत आहे. या नाट्यगृहाची पाहणी माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी केली.

या नाट्यगृहातील आसन व्यवस्था, स्टेज, साऊंड सिस्टिम, प्रेक्षक गॅलरी, पार्किंग यास अन्य कामाची पाहणी त्यांनी केली. या वेळी त्यांच्यासमवेत मुख्याधिकारी अजय कुमार एडके, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, माजी गटनेते महेंद्र गुजर माजी उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, अहमद दर्जी, व माजी नगरसेवक उपस्थित होते.

रोहातील नाट्यप्रेमींना हे नाट्यगृह परवणीच ठरणार आहे. तर दुसरीकडे नवोदित कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी संधी मिळणार आहे.



## डाक विभागात डिजिटल उत्क्रांती

**रायगड : रामप्रहर वृत**

भारत सरकारच्या डाक विभागाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सुविधामध्ये बदल घडवून आणण्याचे सरकारने ठरविले आहे. त्याकरता डाक विभागात आयटी २.० या संगणकीय प्रणालीची अंमलबजावणी होणार आहे. या प्रणालीमुळे डाक विभागाद्वारे पुरविण्यात येणारी सेवा ही अचूक, जलद व ग्राहकाभिमुख होईल.

या आयटी २.० प्रणालीची अंमलबजावणी ही दि. ०५ ऑगस्ट २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील सर्व डाक कार्यालयात (प्रधान डाकघर, उपडाकघर, शाखाडाकघर) होणार आहे. याकरिता Data Transfer ही अत्यंत महत्वाची प्रक्रिया असते जी ४ ऑगस्ट २०२५ (सोमवार) रोजी केली जाईल. या कारणांमुळे रायगड जिल्ह्यातील डाक कार्यालयासंबधित सर्व कामे ही ४ ऑगस्ट २०२५ (सोमवार) रोजी बंद राहतील.

सर्व ग्राहकांनी त्यांची डाक कार्यालयासंबधित जी काही तातडीची कामे आहेत. २ ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करून घ्यावीत. ग्राहकांच्या हिताच्या उद्देशाने हे सर्व प्रयत्न केले जात आहेत. सर्व ग्राहकांनी याची कृपया नोंद घ्यावी व सहकार्य करावे.

## जिल्हा न्यायालयात लोक अदालत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, असे वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग श्रीमती तेजस्विनी निराळे यांनी कळविले आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्हयातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलंबित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्या कडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात.

१३ सप्टेंबर २०२५ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन राजेंद्र सावंत यांनी केले आहे.

## माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुपतर्फे विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुप यांच्या विद्यमाने समाजातील इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत ६५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण संपादन करून उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवार २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता कुणबी भवन हॉल माणगाव येथे तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्याहस्ते व साले ग्रुपचे अध्यक्ष भागोजीबुवा डवले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच कुणबी समाज साले ग्रुपचे सल्लागार प्रभाकर उभारे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे उपाध्यक्ष शैलेश भोनकर, सरचिटणीस रामभाऊ टेंबे, खजिनदार बाळाराम नवगणे, सदस्य शांताराम भोरावकर, राजाराम वाढवळ, राजाराम टेंबे, राजेंद्र शिर्के, गंगाराम उभारे, राजेंद्र नवगणे, नितीन खडतर, संगीता बक्कम, नीता करकरे आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साले ग्रुपचे अध्यक्ष भागोजीबुवा डवले यांच्या मार्गदर्शनाखाली साले ग्रुपचे सर्व पदाधिकारी व सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत.

## मी भाजपशी एकनिष्ठ -ममता थोरे

**माणगाव : प्रतिनिधी**

मी भारतीय जनता पार्टीशी एकनिष्ठ असून भाजप पक्षाचीच नगरसेविका म्हणून माणगाव नगरपंचायतीत आतापर्यंत काम करत आली असून यापुढेही करणार असल्याचे स्पष्टीकरण नगरसेविका ममता थोरे यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना दिले आहे.

माणगाव शहरात अलीकडच्या काळात काही राजकीय घडामोडी घडणार आहेत. माणगावमधील एक मोठे राजकीय नेते पक्षांतर करणार असून त्यांच्यासोबत नगरपंचायतीचे नगराध्यक्ष,काही नगरसेविका, नगरसेवक प्रवेश करणार असल्याचे समजते. या पक्ष प्रवेशाची जोरदार चर्चा माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यात सुरू असून हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रवेशाचा सोहळा २ ऑगस्टला माणगावात होणार असल्याची माहिती समोर आली आहे. या पक्ष प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर माणगाव नगरपंचायतीच्या वॉर्ड क्रं.४ मधील भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका ममता थोरे यांनी प्रसार माध्यमांजवळ संवाद साधताना आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

या वेळी प्रसार माध्यमांजवळ बोलताना नगरसेविका ममता थोरे यांनी सांगितले की, मी कोणत्याही पक्षात प्रवेश करणार नाही यापूर्वीही आम्ही राष्ट्रवादी पक्षासोबत युती मध्येच होतो आणि गेली अडीच वर्ष सत्तेत नसताना ही आम्ही राष्ट्रवादी पक्षासोबत आमचा युती धर्म प्रामाणिकपणे पाळला आहे तसेच केंद्रात व राज्यात आमचा भाजप पक्ष सत्तेत असुन या पक्षाच्या विचारधारेशी मी ठाम आहे. पक्षाचे प्रमुख नेतेमंडळी यांच्या आशीर्वादाने व माझे बंधू भाजपचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मी भाजप पक्ष संघटनेचे काम प्रामाणिकपणे आजपर्यंत करीत आले असून यापुढेही त्याच जोमाने काम करणार आहे. भाजप पक्षाच्या माध्यमातून वेगवेगळे सामाजिक उपक्रम मी माझ्या वॉर्डात माझ्या बंधूच्या मार्गदर्शनाखाली राबविले असून वॉर्डात गेली साडेतीन वर्षात अनेक विकास कामे मी केली आहेत. भाजप पक्षाची नाळ तळागाळातील जनतेशी जुळली असून पक्षाच्या विचारधारेला धरून पक्ष संघटना माणगावात अधिकतम बळकट करण्याचा माझा निर्धार असून याकरिता महिलांना सोबत घेऊन महिला सक्षमीकरणाचे काम करणार आहे. युतीधर्म प्रामाणिकपणे पाळत असताना आम्ही मित्रपक्षाच्या मनोरंजनात्मक किंवा विकासात्मक कार्यक्रमात सहभाग दिला म्हणजे मी पक्षांतर करणार असा गैरसमज कुणी करू नये असे ममता थोरे यांनी शेवटी बोलताना सांगितले.

## कर्जतकरांना शास्तीमाफी योजनेच्या लाभासाठी निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**




महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या थकीत मालमत्ता करावरील शास्तीमाफीसह प्रोत्साहनपर अभय योजनेचा लाभ कर्जत नगरपरिषद क्षेत्रातील नागरिकांनाही मिळावा, यासाठी शिवसेनेवतीने कर्जत नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना अधिकृत निवेदन देण्यात आले.

शिवसेनेचे कर्जत शहरातील माजी नगरसेवक ॲड संकेत भासे, समाजसेवक प्रवीण दादा गांगल, ज्येष्ठ पत्रकार रमाकांत जाधव, शहरप्रमुख संजय मोहिते, शहर संपर्क प्रमुख सुदेश देवघरे, सल्लागार अशोक मोरे, पंकज पवार, समाजसेवक शशांक शेट्टी, प्रदीप वायकर, दिनेश कडू, योगेश थोरवे, युवा सेना शहर संपर्क प्रमुख मिथिलेश म्हणूनकर, प्रज्योत घोसाळकर, सर्व शिवसेनेचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित हे निवेदन सादर करण्यात आले.

राज्य शासनाने दिनांक १९ मे २०२५ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, शास्तीमाफी योजनेचा लाभ देण्यासाठी सर्व नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतींना आदेश देण्यात आले आहेत. परंतु अद्याप कर्जत नगरपरिषद क्षेत्रात या योजनेची अंमलबजावणी न झाल्यामुळे अनेक सामान्य नागरिक अडचणीत सापडले आहेत.

या निवेदनातून कर्जत नगरपरिषद प्रशासनाने शासन निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करावी, आणि शहरातील नागरिकांना थकीत कर भरण्यासाठी संधी द्यावी, अशी ठाम मागणी शिवसेनेने केली आहे.

## जिंदल विद्यालयाचा मानवी मूल्यांवर भर

**मुरूड : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याला प्रोत्साहन देण्यासाठी जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे समुपदेशन सत्राचे आयोजन करण्यात आले. प्रसिद्ध समुपदेशक प्राची देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हे सत्र पार पडले. शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांच्या पुढाकाराने व दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांच्या भावनिक सक्षमीकरणाची ही प्रेरणादायी पायरी ठरली.

विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार सत्र दोन भागांत विभागण्यात आले होते. इयत्ता सहावी ते आठवीसाठी 'लिंग संवेदनशीलता' हा विषय हाताळण्यात आला. प्राची देशमुख यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, प्रत्येक व्यक्तीप्रती आदरभाव, समतेची जाणीव आणि सर्वसमावेशकतेचे मूल्य स्पष्ट केले. शाळेतील वातावरण समजूतदार आणि सुसंवादी व्हावे यावर भर देण्यात आला.

इयत्ता नववी ते बारावीसाठी घेण्यात आलेल्या सत्रात 'तणाव व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. दोन्ही सत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांना त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक आयुष्यात उपयुक्त ठरणाऱ्या गोष्टींबाबत अंतर्मुख होण्याची संधी मिळाली. हा उपक्रम केवळ समुपदेशनापुरता मर्यादित राहिला नाही, तर मनाला भिडणारा अनुभव ठरला.



## महावाचन उत्सवात लोखंडे विद्यालयाचे यश

**मुरूड : प्रतिनिधी**

पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयाने इयत्ता सहावी ते आठवी गटांमधील शालेय विद्यार्थ्यांसाठी तालुका स्तरावर महावाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी या विद्यालयातून महावाचन उपक्रमात सुमारे २७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.



या विद्यालयातील इयत्ता आठवीमधील स्नेहल गणेश तांदळेकर व किशोर विजय ठाकर यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे. नुकताच या महावाचन उपक्रमाचा रायगड जिल्हा परिषद अलिबाग शिक्षण विभागाकडून निकाल जाहीर करण्यात आला. या वेळी या दोन विद्यार्थ्यांनी मोठे धवल यश प्राप्त केले आहे. या दोन विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद रायगड शिक्षण विभागाकडून प्रमाणपत्र व दोघांनाही प्रत्येकी दहा वाचनीय पुस्तके भेट देण्यात आली आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक अरुण खुळपे, ज्येष्ठ शिक्षक अकिल मुलाणी सर व संजय ठमके सर यांनी अभिनंदन करून प्राप्त पुस्तके व प्रमाणपत्र देण्यात आली.

## ॲड. माधवी धारिया यांची निवड

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी जिल्हास्तरावर 'स्थानिक तक्रार समिती' गठण अहवाल प्रत देण्याबाबत तसेच समिती सदस्य पदी पोलादपूर येथील पब्लिक नोटरी व ज्येष्ठ वकील माधवी धारिया यांची निवड झाल्याचे अधिकृत शासकीय पत्र रायगड जिल्हाधिकारी व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयातून त्यांना प्राप्त झाले आहे. या समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल एडव्होकेट माधवी धारिया यांचे रायगड जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुहिता ओव्हाळ आणि रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी अभिनंदन केले आहे.



पोलादपूर तालुक्यातील शिक्षण, कला, सामाजिक तसेच महिला सक्षमीकरण क्षेत्रात ॲड. माधवी धारिया यांनी गेल्या काही वर्षांत आपल्या कार्यक्षमतेने नावलौकिक केला असून तालुक्यात त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## शिळफाटा विद्यालयातील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढली

**खालापुर : प्रतिनिधी**

महात्मा गांधी शाळा क्रमांक ११ ही शैक्षणिक क्षेत्रात एक प्रेरणादायी उदाहरण बनली आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी ८० असलेली शाळेची पटसंख्या आता १८० च्या पुढे गेली आहे, जी १००% पेक्षा जास्त वाढ दर्शवते. ही लक्षणीय वाढ शाळेतील उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण, समर्पित शिक्षकवृंद आणि व्यवस्थापनाच्या अथक प्रयत्नांचे द्योतक आहे.





दोन वर्षांपूर्वी शाळेची पटसंख्या केवळ ८० होती. त्यावेळी अनेक आव्हाने होती, परंतु शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षकांनी एकत्रितपणे काम करून शाळेची गुणवत्ता सुधारण्याचा संकल्प केला. विद्यार्थ्यांसाठी पूरक अभ्यासक्रम, आधुनिक शिकवण्याच्या पद्धती, आणि पालक-शिक्षक यांच्यातील नियमित संवाद यामुळे विद्यार्थ्यांचा शाळेकडे ओढा वाढला.

शाळेचे मुख्याध्यापक स्वाती विकास नाईक यांनी सांगितले, आम्ही नेहमीच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यावर भर दिला आहे. विद्यार्थ्यांची वाढती संख्या हे आमच्या मेहनतीचे फळ आहे.

नगरपालिकेचे मुख्याधिकारी पंकज पाटील तसेच स्थानिक माजी नगरसेवक सुनील पाटील, वनिता हरीश काळे, उद्योजक हरीश काळे, दिलीप जाधव यांनीही शाळेच्या या यशाचे कौतुक केले. महात्मा गांधी शाळा क्र. ११ ने इतर शाळांसाठी एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांची ही प्रगती नक्कीच अभिनंदनीय आहे, असे त्या म्हणाल्या.

पटसंख्येत झालेल्या या वाढीमुळे शाळेत अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली आहे. वाढीव वर्गखोल्या, अद्ययावित ग्रंथालय विकासासाठी स्थानिक प्रशासनाने मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. समीक्षा धानिवले, गोरखनाथ सानप, अश्विनी बिरादार, रुपाली पाटील यांचे योगदान आहे.

# ऋषभ पंत दुखापतग्रस्त

## सहा आठवडे विश्रांतीचा सल्ला

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड दौऱ्यात भारतीय क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. टीम इंडियाचा स्टार यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर झाला आहे. मँचेस्टर कसोटीच्या पहिल्या दिवशी पंतच्या उजव्या पायाच्या बोटात मोठी दुखापत झाल्यानंतर डॉक्टरांनी त्याला सहा आठवडे विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे.



भारत आणि इंग्लंड याच्यात मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड येथे खेळल्या जात असलेल्या चौथा कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी क्रिस वोक्सच्या चेंडूवर रिव्हर्स स्वीप खेळण्याच्या प्रयत्नात ऋषभ पंतला दुखापत झाली. चेंडू पंतच्या उजव्या पायाच्या बोटाजवळ लागला. फिजिओ मैदानावर आले तेव्हा त्यांना पंतच्या पायातून रक्त येत असल्याचे दिसले. त्यानंतर पंतला मैदानाबाहेर नेण्यात आले.

'क्रिकबझ'ने वृत्त दिले आहे की, ऋषभ पंतच्या पायाच्या बोटात फ्रॅक्चर आहे आणि त्यामुळे तो कसोटी मालिकेतून बाहेर पडला आहे. या दुखापतीतून सावरण्यासाठी त्याला दोन महिन्यांचा कालवधी लागतील, असे सांगण्यात आले, परंतु वेदना असूनही पंत फलंदाजी करण्यास उत्सुक आहे, अशीही माहिती समोर येत आहे. त्यामुळे तो दुसऱ्या डावात फलंदाजी करताना दिसण्याची शक्यता आहे, अशी माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) दिली. डॅशिंग पंत पहिल्याच डावात नंतर फलंदाजीला आला आणि त्याने अर्धशतकी खेळी केली. लॉर्ड्‌सवरील शेवटच्या कसोटीत पंतलाही बोटाला दुखापत झाली होती, ज्यामुळे तो विकेटकीपिंग करण्यासाठी मैदानात आला नव्हता, परंतु त्याने फलंदाजी केली होती.

पंत जायबंदी झाल्यामुळे या मालिकेत भारतीय संघाच्या दुखापतग्रस्त खेळाडूंच्या वाढत्या यादीत आणखी एका नावाची भर पडली आहे. नितीश कुमार रेड्डी यापूर्वीच मालिकेतून बाहेर झाला आहे, तर वेगवान गोलंदाज आकाश दीप (पाठदुखी) आणि अर्शदीप सिंग (बोटाची दुखापत) चौथ्या सामन्यासाठी उपलब्ध होऊ शकले नाहीत.

### ओव्हल कसोटीत इशान किशन करणार पुनरागमन?

दुखापतग्रस्त ऋषभ पंत अंतिम कसोटी सामन्याला मुकणार असल्याने मालिकेतील अखेरच्या ओव्हल येथे होणाऱ्या पाचव्या कसोटी सामन्यासाठी यष्टीरक्षक–फलंदाज इशान किशनला संघात स्थान दिले जाण्याची दाट शक्यता आहे. या निवडीमुळे तब्बल दोन वर्षांच्या कालावधीनंतर इशान किशनचे कसोटी संघात पुनरागमन होईल. या निवडीमुळे इशान किशनचे सुमारे दोन वर्षांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन होणार आहे. इतकेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही त्यांचे जवळपास २० महिन्यांनंतर पुनरागमन ठरेल.

# थाईबॉक्सिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंचे सुयश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हैदराबाद येथे झालेल्या अकरावी राष्ट्रीय थाईबॉक्सिंग फेडरेशन कप व प्रो नाईट फाईट स्पर्धेचे आयोजन थाईबॉक्सिंग इंडिया फेडरेशनद्वारे करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रामधून ७२ खेळाडू सहभागी झाले होते. त्यापैकी रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी १४ सुवर्णपदक, दोन रौप्यपदक आणि तीन प्रो बेल्ट मिळवत सुयश संपादन केले.

एशियन थाईबॉक्सिंग फेडरेशन, वर्ल्ड थाईबॉक्सिंग फेडरेशन, स्कूल गेम ऑफ फेडरेशन यांच्या मान्यतेने स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत भावी मांजरेकर, मधुरा कर्डिले, सानिया शेख, श्रेया कुंडलकर, यशस्वी सावडेकर, प्रत्युषा वशीमकर, रोनल पाटील, वरद सांगळे, आरव मंडारे, जयराज कर्डिले, शुभम पवार, आयुष नवले, संदेश उचीन, शौर्यवर्धन दांडी यांनी सुवर्णपदक; दर्शित माळी, जिया मांजरेकर यांनी रौप्यपदक जिंकले; तर अवंतिका सिबिश, अवंती श्रेष्ठी, हर्ष धनवडे हे प्रो टायटल बेल्टचे मानकरी ठरले.

विजेत्या खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक योगेश बैकर, सुरेश राठोड, रोहित थळी, वीरेश राठोड यांचे मार्गदर्शन लाभले, तर महाराष्ट्र थायबॉक्सिंग असोसिएशनचे चेअरमन मंदार पनवेलकर, अध्यक्ष फरान नबिजा, उपाध्यक्ष निलेश भोसले यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रसेलने शेवटच्या सामन्यात रचला इतिहास

## एकही शतक न झळकावता १५०पेक्षा जास्त षटकार मारणारा एकमेव फलंदाज




**जमैका : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजचा स्फोटक अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसेलने आपल्या शेवटच्या आंतरराष्ट्रीय टी–२० सामन्यात आपल्या नेहमीच्या आक्रमक शैलीत फलंदाजी साकारली. या सामन्यात केवळ वादळी खेळीच केली नाही, तर एक अनोखा विश्वविक्रमही आपल्या नावे केला. ऑस्ट्रेलियाविरुद्धचा दुसरा टी–२० सामना रसेलच्या कारकिर्दीतील अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना होता. जेव्हा तो फलंदाजीसाठी मैदानात उतरला, तेव्हा दोन्ही संघांच्या खेळाडूंनी रांगेत उभे राहून त्याला 'गार्ड ऑफ ऑनर' दिला. या सन्मानाला उत्तर देताना रसेलने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ केला. त्याने केवळ १५ चेंडूंत दोन चौकार आणि चार गगनचुंबी षटकारांसह २४०च्या स्ट्राइक रेटने ३६ धावांची तुफानी खेळी साकारली. ज्या आक्रमक शैलीसाठी तो ओळखला जातो, त्याच शैलीत खेळून त्याने चाहत्यांना एक अविस्मरणीय भेट दिली.

आपल्या शेवटच्या सामन्यात चार षटकार मारताच रसेलने एका अनोख्या विश्वविक्रमाला गवसणी घातली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकही शतक न झळकावता १५०पेक्षा जास्त षटकार मारणारा तो जगातील एकमेव फलंदाज ठरला आहे. त्याची ही कामगिरी त्याला इतर पॉवर–हिटर्सपेक्षा वेगळे ठरवते. रसेलने आपल्या स्फोटक खेळीने चाहत्यांची मने जिंकली. या अविस्मरणीय वातावरणात त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अखेरचा सलाम ठोकला.

या लढतीत विंडीजने २० षटकांत ८ बाद १७२ धावा केल्या, तर प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने १५.२ षटकांतच २ बाद १७३ धावांसह एकतर्फी विजय नोंदवला. ऑस्ट्रेलियातर्फे जोश इंग्लिसने ३३ चेंडूंत सात चौकार, पाच षटकारांसह ७८, तर कॅमेरून ग्रीनने ३२ चेंडूंत ५६ धावा चोपल्या.

# साई सुदर्शनने केले संधीचे सोने

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशांतर्गत क्रिकेट आणि आयपीएल गाजवल्यानंतर साई सुदर्शनला भारतीय संघात व पहिल्या कसोटीत स्थान मिळाले, पण पदार्पणात फ्लॉप राहिल्यानंतर त्याला बाहेर करण्यात आले होते. आता करुण नायरला संघातून वगळल्यानंतर साई सुदर्शनला पुन्हा प्लेइंग ११मध्ये स्थान मिळाले. या संधीचे सोने त्याने दमदार अर्धशतकी खेळीने केले.

या सामन्यात साई सुदर्शन तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. चांगली सुरुवात मिळाल्यामुळे त्याला सेट होण्यासाठी वेळ मिळाला. त्याने याचा फायदा घेत यशस्वी जैस्वालसोबत आणि यानंतर ऋषभ पंतसोबत मिळून भागीदारी केली. दरम्यान या डावात साईने ६१ धावांची खेळी केली. हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील पहिले अर्धशतक ठरले.

# रायगड जिल्हा बास्केटबॉल निवड चाचणी रविवारी खांदा कॉलनीत

**पनवेल : वार्ताहर**

बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगडच्या वतीने १८ वर्षाखालील मुले व मुली यांच्यासाठी जिल्हा निवड चाचणीचे आयोजन येत्या रविवारी (दि. २७) सकाळी ७ वाजता खांदा कॉलनीतील महात्मा स्कूल मैदानात करण्यात आले आहे. या निवड चाचणीतून निवडलेला संघ ९ ते १४ ऑगस्टदरम्यान पुणे बालेवाडी येथे होणाऱ्या १८ वर्षाखालील महाराष्ट्र राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल.



रायगड जिल्ह्यातील सर्व बास्केटबॉल खेळाडूंना या निवड चाचणीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. खेळाडूंनी निवड चाचणीसाठी येताना दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, वयाचा पुरावा (जन्म प्रमाणपत्र) आणि निवासाचा पुरावा (आधार कार्ड किंवा समकक्ष कागदपत्र) सोबत आणणे बंधनकारक आहे.

जिल्ह्यातील युवा खेळाडूंना त्यांचे कौशल्य दाखविण्यासाठी ही एक उत्तम संधी आहे. क्रीडा क्षेत्रातून तरुणांना घडविण्याचे आमचे ध्येय आहे. या निवड चाचणीमुळे नव्या प्रतिभांना संधी मिळेल. बास्केटबॉलच्या माध्यमातून खेळाडूंनी आपल्या जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर उंचावावे, यासाठी सर्वांनी उत्साहाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन महाराष्ट्र बास्केटबॉल संघटना उपाध्यक्ष तथा बास्केटबॉल असोसिएशन ऑफ रायगडचे अध्यक्ष आमदार विक्रांत पाटील यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी खेळाडूंनी सचिव नईम चिकटे (९७७३९१३४३४), विवेक गोरे (८१६९६५७९१९), आकाश चाकणे (९०२९५९६९४९) यांच्याशी संपर्क साधावा.

# अर्धशतकासह यशस्वी जैस्वालचा पराक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

मँचेस्टरच्या मैदानावर इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटीत भारतीय संघाकडून डावाची सुरुवात करण्यासाठी आलेल्या यशस्वी जैस्वालने आपले अर्धशतक पूर्ण केले. हे अर्धशतक विक्रमी ठरले, कारण तो मँचेस्टरच्या मैदानावर ५० वर्षांनंतर अर्धशतक झळकावणारा पहिलाच भारतीय सलामीवीर फलंदाज ठरला आहे.

याआधी १९७४मध्ये सुनील गावसकर यांनी मँचेस्टरच्या मैदानावर खेळताना अर्धशतकी खेळी केली होती. यासह यशस्वीने आणखी एका मोठ्या विक्रमात दिग्गज खेळाडूंच्या यादीत स्थान मिळवले आहे. अर्धशतक पूर्ण केल्यानंतर त्याने कसोटी क्रिकेटमध्ये इंग्लंडविरूद्ध फलंदाजी करताना एक हजार धावा पूर्ण केल्या आहेत. यादरम्यान इंग्लंडविरुद्ध सर्वात जलद इतक्या धावा करण्याच्या विक्रमात त्याने मोहम्मद अझरूद्दीन याच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. यशस्वीने १६व्या डावात हा मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे.

# तेंडुलकर-द्रविडसह गावसकरांच्या क्लबमध्ये लोकेश राहुलची एन्ट्री


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यात लोकेश राहुलने आपला क्लास दाखवत इंग्लंडच्या मैदानात कसोटीत एक हजार धावांचा पल्ला गाठला. कसोटी क्रिकेटमध्ये इंग्लंडमध्ये हा टप्पा गाठणारा तो पाचवा भारतीय फलंदाज ठरला आहे. या कामगिरीसह त्याने खास क्लबमध्ये एन्ट्री मारलीये.



क्रिकेटच्या मैदानात अनेक विक्रम प्रस्थापित करणाऱ्या विक्रमादित्य सचिन तेंडुलकरने इंग्लंडच्या मैदानात भारताकडून सर्वाधिक १५७५ धावा केल्या आहेत. या यादीत राहुल द्रविड दुसऱ्या स्थानावर आहे. मध्यफळीतील जबाबदारी बजावताना द्रविडने इंग्लंडच्या मैदानात १३७६ धावा काढल्या आहेत. लिटल मास्टर सुनील गावसकर या यादीत ११५२ धावांसह तिसऱ्या स्थानावर आहेत. सलामीवीराच्या रूपात इंग्लंडच्या मैदानाशिवाय वेस्ट इंडिज आणि पाकिस्तानच्या मैदानात एक हजारपेक्षा अधिक धावा केल्याचा रेकॉर्ड आहे.

विराट कोहलीने कसोटी कारकिर्दीत ३३.२१च्या सरासरीसह इंग्लंडच्या मैदानात १०९६ धावा केल्या आहेत. राहुलने विराटपेक्षाही उत्तम सरासरीसह (४२.८३) इंग्लंडमध्ये हजार धावांचा पल्ला गाठला आहे.



# आयुष म्हात्रेने वैभव सूर्यवंशीला टाकले मागे

## कसोटी मालिकेत नऊ षटकार खेचत रचला मोठा विक्रम

**चेम्सफोर्ड : वृत्तसंस्था**

गेल्या काही महिन्यांत नव्या पिढीतील वैभव सूर्यवंशीने षटकारांचा नवा इतिहास रचला आहे, पण आता वैभवलाही मागे टाकणारा नवा भिडू तयार झाला आहे तो म्हणजेच टीम इंडियाच्या अंडर १९ संघाचा कर्णधार आयुष म्हात्रे. आयुषने वैभवपेक्षा दोन जास्त षटकार मारून एक नवीन विक्रम रचला आहे तसेच तो १९ वर्षांखालील कसोटी सामन्यात २००पेक्षा जास्त धावा करणारा एकमेव भारतीय कर्णधारही बनला आहे.




कसोटी क्रिकेटमध्ये आयुष म्हात्रे हा मराठमोळा फलंदाज १९ वर्षांखालील क्रिकेटमध्ये आघाडीचा भारतीय फलंदाज म्हणून उदयास येत असल्याचे दिसून येते. इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्ध खेळल्या गेलेल्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत आयुष सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज बनला आहे. त्याने इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्ध खेळलेल्या दोन युवा कसोटी सामन्यात एकूण नऊ षटकार मारले. त्यापैकी सहा षटकार त्याने एकाच डावात मारले. नऊ षटकारांसह आयुष युवा कसोटी मालिकेत सर्वाधिक षटकार मारणारा भारतीय खेळाडू बनला. त्याच्या आधी हा विक्रम सौरभ तिवारीच्या नावावर होता. त्याने २००७–०८मध्ये खेळल्या गेलेल्या मालिकेत आठ षटकार मारले होते.

गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळल्या गेलेल्या चार सामन्यांच्या युवा कसोटी मालिकेत वैभव सूर्यवंशीने सात षटकार मारले होते, पण वैभवला सौरभ तिवारीचा विक्रम मोडता आला नव्हता. आयुषने वैभवपेक्षा दोन षटकार जास्त मारले आणि सौरभ तिवारीचा विक्रमच मोडला.

### १९ वर्षांचा जुना विक्रमही मोडला

इंग्लंडविरुद्धच्या युवा कसोटी मालिकेत आयुष म्हात्रेने सर्वाधिक षटकार मारण्यात यश मिळवले तसेच तो कर्णधार म्हणून युवा कसोटी मालिकेतील एकाच सामन्यात सर्वाधिक धावा करणारा कर्णधारही बनला. १८ वर्षीय आयुषने दुसऱ्या युवा कसोटीत पहिल्या डावात ८० आणि दुसऱ्या डावात १२६ धावा करून एकूण २०६ धावा केल्या. आयुषने १९ वर्षांचा जुना विक्रम मोडीत काढला आहे.



दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com